नागपूर महानगरपालिकेची स्थगित सर्वसाधारण सभा **गुरुवार दिनांक १८/०२/२०२१ रोजी सकाळी ११.४५** वाजता महानगरपालिकेच्या श्रीमंत राजे रघुजीराव भोसले, नगरभवन, महाल येथे मागील विचाराधिन तथा नवीन विषयावर विचार करण्याकरिता **महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचे पत्र क्र. कोरोना/ २०२०/प्र.क्र.७६/नवि(१४) दि. ०३-०७-२०२० तसेच सचिवालय विभाग, मनपा कार्यालयाचे दि. ०३-०७-२०२० सूचना/परिपत्रक अन्वये Video Conferencing व्दारे आयोजित केलेल्या सभेचे कार्यवृत्त.**

**उपस्थित सदस्य**

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | **१९** | **ड** | **दयाशंकर चंद्रशेखर तिवारी** | **महापौर** |
| २. | **२३** | **ब** | **मनिषा आशिष धावडे** | **उपमहापौर** |
| ३. | १ | अ | महेन्द्रप्रसाद रमेश धनविजय | सदस्य |
| ४. | १ | ब | सुषमा संजय चौधरी | सदस्या |
| ५. | १ | क | प्रमिला प्रितम मथरानी | सदस्या |
| ६. | १ | ड | विरेन्द्र उर्फ विक्की धनश्यामदास कुकरेजा | सदस्य |
| ७. | २ | अ | भावना संतोष लोणारे | सदस्या |
| ८. | २ | ब | दिनेश बसंतलाल यादव | सदस्य |
| ९. | २ | क | नेहा राकेश निकोसे | सदस्या |
| १०. | ३ | अ | परसराम काशीनाथ मानवटकर | सदस्य |
| ११. | ३ | ब | गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| १२. | ३ | क | भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| १३. | ३ | ड | खान नसीम बानो मो. इब्राहिम | सदस्या |
| १४. | ४ | अ | निरंजना महेश पाटील | सदस्या |
| १५. | ४ | ब | शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| १६. | ४ | क | मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| १७. | ४ | ड | राजकुमार पुनाराम साहु | सदस्य |
| १८. | ५ | अ | रिक्त | |
| १९. | ५ | क | अभिरुची अनिल राजगिरे | सदस्या |
| २०. | ५ | ड | संजय अरुणराव चावरे | सदस्य |
| २१. | ६ | ब | वंदना राजू चांदेकर | सदस्या |
| २२. | ६ | क | वैशाली अविनाश नारनवरे | सदस्या |
| २३. | ६ | ड | मो. इब्राहिम तॉफीक अहमद | सदस्य |
| २४. | ७ | अ | विरंका मुरलीधर भिवगडे | सदस्या |
| २५. | ७ | ब | शेख मोहम्मद जमाल मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| २६. | ७ | क | मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |
| २७. | ७ | ड | संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| २८. | ८ | अ | आशा नेहरु उईके (आयेशा) | सदस्या |
| २९. | ८ | ब | रिक्त | |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| ३०. | ९ | अ | स्नेहा विवेक निकोसे | सदस्या |
| ३१. | ९ | ब | संजय श्यामराव बुर्रेवार | सदस्य |
| ३२. | ९ | क | ममता महेश सहारे | सदस्या |
| ३३. | १० | अ | साक्षी विपीन राऊत | सदस्या |
| ३४. | १० | ड | गार्गी प्रशांत चोपरा | सदस्या |
| ३५. | ११ | अ | संदीप चंद्रभान जाधव | सदस्य |
| ३६. | ११ | ब | संगिता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| ३७. | ११ | ड | भूषण कृष्णराव शिंगणे | सदस्य |
| ३८. | १२ | अ | दर्शनी स्वानंद धवड | सदस्या |
| ३९. | १२ | ब | माया चिंतामन इवनाते | सदस्या |
| ४०. | १२ | ड | विक्रम जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| ४१. | १३ | अ | अमर हरीश बागडे | सदस्य |
| ४२. | १३ | ब | रुतिका योगेश मसराम | सदस्या |
| ४३. | १३ | क | परिणिता परिणय फुके | सदस्या |
| ४४. | १३ | ड | वर्षा जयंत ठाकरे | सदस्या |
| ४५. | १४ | अ | शिल्पा इशांत धोटे | सदस्या |
| ४६. | १४ | ब | प्रमोद ताराचंद कौरती | सदस्य |
| ४७. | १४ | क | कमलेश दिलीप चौधरी | सदस्य |
| ४८. | १४ | ड | प्रगती अजय पाटील | सदस्या |
| ४९. | १५ | अ | सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| ५०. | १५ | ब | उज्वला प्रकाश शर्मा | सदस्या |
| ५१. | १५ | क | रुपा शेखर राय | सदस्या |
| ५२. | १५ | ड | संजय अनंत बंगाले | सदस्य |
| ५३. | १६ | अ | लखन सुमेरा येरवार | सदस्य |
| ५४. | १६ | ब | वनिता सुनिल दांडेकर | सदस्या |
| ५५. | १६ | क | तारा (लक्ष्मी) ओमप्रकाश यादव | सदस्या |
| ५६. | १६ | ड | संदीप दिवाकर जोशी | सदस्य |
| ५७. | १७ | ब | लता सुनिल काडगाये | सदस्या |
| ५८. | १७ | क | हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| ५९. | १८ | अ | प्रवीण प्रभाकर दटके | सदस्य |
| ६०. | १८ | क | नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| ६१. | १९ | अ | संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| ६२. | १९ | ब | विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |
| ६३. | १९ | क | सरला कमलेश नायक | सदस्या |
| ६४. | २० | ब | यशश्री देवराम नंदनवार | सदस्या |
| ६५. | २० | ड | दिपराज भैय्याजी पार्डीकर | सदस्य |
| ६६. | २१ | क | आभा विजयकुमार पांडे | सदस्या |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| ६७. | २२ | अ | राजेश श्रावणजी घोडपागे | सदस्य |
| ६८. | २२ | क | श्रध्दा विजय पाठक | सदस्या |
| ६९. | २२ | ड | मनोज केशवराव चापले | सदस्य |
| ७०. | २३ | अ | कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| ७१. | २३ | क | नरेंद्र (बाल्या) गोविंद बोरकर | सदस्य |
| ७२. | २४ | अ | अनिल शौकीलाल गेंडरे | सदस्य |
| ७३. | २४ | ब | सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| ७४. | २४ | क | चेतना राजू टांक | सदस्या |
| ७५. | २४ | ड | प्रदीप वसंतराव पोहाणे | सदस्य |
| ७६. | २५ | अ | जयश्री योगेश्वर रारोकर | सदस्य |
| ७७. | २५ | क | वैशाली देवचंद रोहणकर | सदस्या |
| ७८. | २५ | ड | दिपक मोतीरामजी वाडीभस्मे | सदस्य |
| ७९. | २६ | अ | धर्मपाल नत्थुजी मेश्राम | सदस्य |
| ८०. | २६ | ब | समिता राजेन्द्र चकोले | सदस्या |
| ८१. | २७ | अ | तानाजी सुकलाजी वनवे | सदस्य |
| ८२. | २७ | ब | दिव्या दिपक धुरडे | सदस्या |
| ८३. | २७ | क | वंदना राजेश भुरे | सदस्या |
| ८४. | २७ | ड | हरीश  सिताराम दिकोंडवार | सदस्य |
| ८५. | २८ | ब | मंगलाबाई प्रशांत गवरे | सदस्या |
| ८६. | २८ | ड | विजय शंकरराव झलके | सदस्य |
| ८७. | २९ | अ | लिला अजय हाथीबेड | सदस्य |
| ८८. | २९ | ब | विद्या योगेश मडावी | सदस्या |
| ८९. | २९ | क | भगवान भाऊराव मेंढे | सदस्य |
| ९०. | २९ | ड | स्वाती चंद्रकांत आखतकर | सदस्या |
| ९१. | ३० | अ | नागेश गोविंदराव सहारे | सदस्या |
| ९२. | ३० | ब | रिता अशोक मुळे | सदस्या |
| ९३. | ३० | क | स्नेहल सतीश बिहारे | सदस्या |
| ९४. | ३० | ड | संजय मधुकर महाकाळकर | सदस्य |
| ९५. | ३१ | अ | उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| ९६. | ३१ | ब | सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| ९७. | ३१ | ड | रविंद्र प्रभाकर भोयर | सदस्य |
| ९८. | ३२ | अ | अभय प्रल्हाद गोटेकर | सदस्य |
| ९९. | ३२ | ब | कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| १००. | ३२ | क | रुपाली प्रशांतसिंह ठाकूर | सदस्या |
| १०१. | ३२ | ड | दिपक मारोतराव चौधरी | सदस्य |
| १०२. | ३३ | अ | वंदना भानुदास भगत | सदस्या |
| १०३. | ३३ | ब | भारती विकास बुंडे | सदस्या |

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १०४. | ३३ | क | विशाखा शरद बान्ते | सदस्या |
| १०५. | ३४ | अ | नागेश महादेव मानकर | सदस्य |
| १०६. | ३४ | ब | राजेन्द्र विठ्ठलराव सोनकुसरे | सदस्य |
| १०७. | ३४ | क | माधुरी प्रवीण ठाकरे | सदस्या |
| १०८. | ३४ | ड | मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| १०९. | ३५ | अ | संदीप रमेश गवई | सदस्य |
| ११०. | ३५ | ब | जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| १११. | ३५ | क | विशाखा प्रकाश मोहोड | सदस्या |
| ११२. | ३५ | ड | अविनाश निलकंठ ठाकरे | सदस्य |
| ११३. | ३६ | अ | मिनाक्षी नितीन तेलगोटे | सदस्या |
| ११४. | ३६ | ब | पल्लवी अशोक श्यामकुळे | सदस्या |
| ११५. | ३६ | क | लहुकुमार दत्तुजी बेहते | सदस्य |
| ११६. | ३६ | ड | प्रकाश सिताराम भोयर | सदस्य |
| ११७. | ३७ | अ | प्रमोद हरिभाऊ तभाने | सदस्य |
| ११८. | ३७ | ब | सोनाली शालीक कडू | सदस्या |
| ११९. | ३७ | क | नंदा शरद जिचकार | सदस्या |
| १२०. | ३७ | ड | दिलीप वामनराव दिवे | सदस्य |
| १२१. | ३८ | अ | उज्ज्वला वसंतराव बनकर | सदस्या |
| १२२. | ३८ | क | प्रणिता चंद्रप्रकाश शहाणे | सदस्या |
| १२३. | ना.स. | | अग्रवाल सुनिल जिवराज | सदस्य |
| १२४. | ना.स. | | पोकुलवार गणेश उर्फ (मुन्ना) रामन्ना | सदस्य |
| १२५. | ना.स. | | गांधी निशांत गिरीश | सदस्य |
| १२६. | ना.स. | | जिचकार किशोर दामोदर | सदस्य |

## **अनुपस्थित सदस्य**

| अनु. क्र. | प्रभाग क्र. | अ/ब | मा. सदस्यांचे नाव | पद |
|---|---|---|---|---|
| १. | २ | ड | मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| २. | ५ | ब | प्रवीण विलासराव भिसीकर | सदस्य |
| ३. | ६ | अ | जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| ४. | ८ | क | जिशानमुमताज मो. इरफान अंसारी | सदस्या |
| ५. | ८ | ड | भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| ६. | ९ | ड | नरेंद्र नत्थुजी वालदे | सदस्् |
| ७. | १० | ब | रश्मि निलमनी धुर्वे | सदस्या |
| ८. | १० | क | नितिश गंगाप्रसादर ग्वालबंशी | सदस्य |
| ९. | ११ | क | अर्चना विवेक पाठक | सदस्या |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०. | १२ | क | हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| ११. | १७ | अ | विजय गोपालराव चुटेले | सदस्य |
| १२. | १७ | ड | प्रमोद छत्रपाल चिखले | सदस्य |
| १३. | १८ | ब | सुमेधा श्रीकांत देशपांडे | सदस्या |
| १४. | १८ | ड | ऋषिकेश (बंटी) नारायण शेळके | सदस्य |
| १५. | २० | अ | शंकुतला वामन पारवे | सदस्या |
| १६. | २० | क | रमेश गणपती पुणेकर | सदस्य |
| १७. | २१ | अ | ज्योती श्रीधर भिसीकर | सदस्या |
| १८. | २१ | ब | नितीन रामभाऊ साठवणे | सदस्य |
| १९. | २१ | ड | महेश केशवराव महाजन | सदस्य |
| २०. | २२ | ब | वंदना वसंतराव यंगटवार | सदस्या |
| २१. | २३ | ड | दुनेश्वर सूर्यभान पेठे | सदस्य |
| २२. | २५ | ब | पुरुषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| २३. | २६ | क | मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| २४. | २६ | ड | जितेंद्र धनराज कुकडे | सदस्या |
| २५. | २८ | अ | किशोर रतनलाल कुमेरिया | सदस्य |
| २६. | २८ | क | रेखा राजू साकोरे | सदस्या |
| २७. | ३१ | क | शीतल प्रशांत कामडे | सदस्या |
| २८. | ३३ | ड | मनोजकुमार धोंडुजी गावंडे | सदस्य |
| २९. | ३८ | ब | प्रफुल्ल विनोंदराव गुडधे | सदस्य |
| ३०. | ना.स. | | वानखेडे किशोर रामकृष्ण | सदस्य |

**उपस्थित अधिकारी**

**श्री.राधाकृष्णन बी. निगम आयुक्त**

**डॉ.रंजना लाडे निगम सचिव**

वंदेमातरम होवून सभेच्या कार्यवाहीस सुरुवात करण्यात आली.

(मा.महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी भारतीय संविधान प्रस्तावनाचे सभागृहात वाचन केले)

**ठराव क्रमांक ४१ :-** मा. महापौरजी यांनी दिलेल्या निर्देशान्वये निगम सचिव यांनी खालील अभिनंदन प्रस्ताव सभागृहात वाचून दाखविले आणि सभागृहाने त्यास मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मान्यता प्रदान केली.

**अभिनंदन प्रस्ताव**

पद्म पुरस्काराने सन्मानित महनीय

यंदा प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केन्द्र सरकारने 7 व्यक्तिंना पद्मविभूषण, 10 व्यक्तिंना पद्मभूषण व 102 व्यक्तिंना पद्मश्री पुरस्कार जाहीर केला आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील परशुराम ए.गंगावणे (कला), नामदेव सी कांबळे (कला), जसवंती बेन पोपट (व्यापार), गिरीश प्रभुणे (सामाजिक कार्य), सिंधुताई सपकाळ (सामाजिक कार्य) या पाच व्यक्तिंचा समावेश आहे. तसेच मूळचे नागपूरकर असलेले केरळ मधील वायनाड या आदिवासी बहुल जिल्हयात मागील 40 वर्षाहून अधिक काळ स्वामी विवेकानंद मेडीकल मिशन 'मुट्टील' या संस्थेतर्फे निरंतर सेवाभावी वृत्तीने आदिवासी समाजाला आरोग्य विषयक सेवा देणारे डॉ.धनंजय उर्फ अजय सगदेव यांना सुध्दा पद्मश्री पुरस्कार घोषीत झाल्याबद्दल मनपाची हि सभा उपरोक्त सर्व पद्म पुरस्कार प्राप्त व्यक्तिंचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>डॉ. एन.राजम्</u>**

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे देण्यात येणारा सन 2020 चा भारतरत्न पंडित भीमसेन जोशी जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ व्हायोलिन वादक डॉ.एन.राजम् यांना जाहीर करण्यात आल्याबद्दल मनपाची हि सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>सुधाकर गायधनी</u>**

भूतान येथील विश्वसाहित्य शांतता आणि मानवाधिकार मंच या जागतिक संस्थेने महाकवी सुधाकर गायधनी यांना आंतरराष्ट्रीय शांतीदूत या पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल मनपाची हि सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>धर्मराज नाकोड</u>**

अग्निशमन व आणिबाणी सेवा विभाग महानगरपालिका, नागपूर येथील सेवानिवृत्त सहाय्यक अग्निशमन केन्द्र अधिकारी धर्मराज एन नाकोड यांना भारताचे मा.राष्ट्रपती यांच्या वतीने अग्निशमन सेवेतील गुणवत्तापुर्वक कामगिरीकरीता अग्निशमन सेवा पदक जाहीर झाल्याबद्दल मनपाची हि सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>राजेश नगरूरकर / शारदाप्रसाद मिश्रा</u>**

देशातील 946 पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येवर राष्ट्रपती पद्क जाहीर झाले आहे. त्यामध्ये नागपूरचे राजेश नगरूरकर राखीव पोलीस उपनिरीक्षक व शारदाप्रसाद मिश्रा सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, अंबाझरी नागपूर यांचा समावेश आहे. तरी या बहुमानाबद्दल उपरोक्त दोन्ही अधिकाऱ्यांची मनपाची हि सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**<u>डॉ. श्याम धोंड</u>**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचा सन 2019 या वर्षाचा स्व.यशवंतराव चव्हाण, राज्य वाङमय पुरस्कार नागपूरचे डॉ. श्याम धोंड यांना जाहीर झाल्याबद्दल मनपाची हि सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**श्रीनभ अग्रवाल**

आपल्या नावीन्यपूर्ण युक्तीच्या आणि कृषी तंत्राच्या सहाय्याने हजारो शेतकऱ्यांच्या जीवनात बदल घडविणाऱ्या चंदादेवी सराफ शाळेत शिकणाऱ्या श्रीनभ अग्रवाल याला पंतप्रधान राष्ट्रीय बाल पुरस्कार मिळाल्याबद्दल मनपाची हि सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**माधुरी अशिरगडे**

मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमीतर्फे देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय कर्तृत्ववान महिला नारीरत्न पुरस्काराकरिता नागपूर येथील सुप्रसिध्द लेखिका व पटकथाकार माधुरी आनंद अशिरगडे यांची निवड झाल्याबद्दल मनपाची हि सभा त्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

**पोलीस स्टेशन तहसील (नागपूर)**

राज्यातील सर्व पोलीस स्टेशनमध्ये नोंदविण्यात आलेल्या गुन्हयांची आकडेवारी शासनाने जाहीर केली असून त्यामध्ये नागपूरच्या पोलीस स्टेशन तहसील मध्ये सर्वात कमी गुन्हयांची नोंद झाल्याबद्दल मनपाची हि सभा तहसील पोलीस स्टेशनचे सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे विशेष रूपाने हार्दिक अभिनंदन करीत आहे.

महापौर :- नागपूर महानगरपालिका की सभा से हम जिन व्यक्तीयों का अभिनंदन करते है उन सभी को महानगरपालिका की और से इस अभिनंदन प्रस्ताव के पश्चात व्यक्तीगत पत्र जाना चाहिये, निगम सचिव कृपया ध्यान देकर के जितने भी महापुरुषों को हमने अभी अभिनंदन दिया है प्रत्येक सभा के पश्चात उन्हे व्यक्तीगत पत्र इस स्थिती मे हमने आपका अभिनंदन सभागृह मे किया है ऐंसा एक अभिनंदन पत्र भेजने की हम लोग परिपाठ की शुरुवात करे ऐंसा मे इस सभागृह के माध्यम से निर्देश देता हु, हम प्रश्नोत्तर काल की शुरुवात करेंगे ।

**प्रश्न क्र २०९ :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५७ मध्ये रजा देण्या संदर्भात प्रश्न

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

**प्रश्न क्र २१०** :- नागपूर महानगरपालिके व्दारे जे ६ डीपी रोड सुरु केले संदर्भात प्रश्न

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

**प्रश्न क्र २११** :- आयुक्त, अप्पर आयुक्त, उपायुक्त यांच्या माताहात काम करीत असलेले ओ.एस.डी. किंवा स्वीय सहाय्यक किंवा इतर पदावरील काम करीत असणारे संदर्भात

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

**प्रश्न क्र २१२** :- मोमीनपुरा बकरा मंडी ही मनपाच्या जागेवर असून हया बकरा मंडीमुळे मनपाला कोणत्या प्रकारचे

उत्पन्न होते? या संदर्भात प्रश्न

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

**प्रश्न क्र २१३** :- नागपूर मनपाला कायद्याप्रमाणे देय असलेले विविध वैधानिक देणी किती प्रलंबित आहेत व कोणकोणत्या विभागांतर्गत आहेत. त्यांची वर्षनिहाय व रक्कमनिहाय माहिती देण्या संदर्भात

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

**प्रश्न क्र २१४** :- शहरातील घरोघरी कचरा उचलण्याचे काम AG Enviro व BVG या कंपन्या मार्फत करण्यांत येते या कंपन्यामध्ये कर्मचा-यांना लॉकडाऊन कालावधीत कमी करण्यांत आले त्या संदर्भांत प्रश्न

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

**प्रश्न क्र २१५** :- शहरातील एल.ई.डी. लाईट बाबत माहिती संदर्भांत प्रश्न.

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

श्री.विरेंद्र कुकरेजा :- मा.महापौरजी, इस विषय के उपर मे आज पुरे नागपूर शहर मे गुंठेवारी के अधिकांश क्षेत्र मे पोल खडे है, केबलिंग होकर एक साल हो गया है लेकीन वहापर एल.ई.डी. लाईट नही लगे है, स्थायी समिती मे यह विषय मंजूर होकर देढ साल हो चुका है लेकीन आज भी कई भागों मे एल.ई.डी. लाईट नही लगे है।

महापौर :- प्रशासनाने उत्तर दयावे.

कार्यकारी अभियंता (श्री.मानकर) :- मा.महापौरजी, मा.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देतो की, शहरात जे पथदिवे विरहीत खांब आहे त्या करीता निविदा बोलाविल्या आहे. त्याला सभागृहाने मंजूरी दिलेली आहे आणि स्थायी समितीने मंजूरी दिली आहे. येत्या २३ तारखेला निविदा उघडणार आहे. त्यानंतर ही फिटींग उपलब्ध होणार आहे. शहरात जे पथदिवे विरहीत खांब आहे त्या खांबावर पथदिवे लावण्यात येईल.

श्री.विरेंद्र कुकरेजा:- मा.महापौरजी, स्टॅडींग कमेटीमे यह विषय पिछले फेब्रुवारी मे हुवा है उसके बाद पुरे शहरभर मे कुल ११००० से १२००० हजार एल.ई.डी. लाईट लगने वाले थे उसको देड साल हो गया है प्रशासन की तरफ से यह विषय जानबुझकर विलंब हुवा है और नागपूर शहर की जनता को अंधेरे मे रखने का काम किया है, जबदरस्ती डिले करने का काम प्रशासन कर रहा है उसके उपर कारवाई होनी चाहिये।

महापौर :- प्रशासनाने ताबडतोब जे पथदिवे विरहीत पोल आहे त्यावर एल.ई.डी. लाईट लावण्याची कारवाई करावी. प्रशासनाने दिलेले उत्तर समाधानकारक नाही असे संबंधित सदस्यांचे म्हणणे आहे, सन्माननिय सदस्यांचे समाधान झाले पाहिजे या दृष्टीने प्रशासनाने कारवाई करावी, एक महिन्यात नागपूर शहरात प्रत्येक ठिकाणी एल.ई.डी. लाईट लागलेले दिसले पाहिजे या दृष्टीने प्रशासनाने पाऊल उचलावे व कामे पुर्णत्वास आणावे.

**प्रश्न क्र २१६** :- सातरोग अधिनियम लक्षाम घेता संपूर्ण जगामध्ये कोरोना महामारी संसर्ग या संदर्भात माहिती

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

**प्रश्न क्र २१७** :- नागपूर शहरातील मनपाच्या शाळा मोक्याच्या आणि विस्तीर्ण जागेवर दुरावस्थेत आहेत. या संदर्भात प्रश्न.

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

श्री.राजेंद्र सोनकुसरे :- मा.महापौरजी, मा.सदन, मा.आयुक्त साहेब आज परिस्थिती नुसार अन्न, वस्त्र, निवारा, सोबत स्वास्थ आरोग्य आणि शिक्षण हे महत्वाचे घटक आहे. येणारी पिढी ही राष्ट्राची धरोवर आहे. या करीता शिक्षणाच्या माध्यमातून सर्वागींन विकास होणे या मागील हेतु आहे. मा.महापौरजी, मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर मला समाधानकारक मिळाले नाही. नागपूर शहरातील म.न.पा. च्या शाळा मौक्याच्या आणि विस्तीर्ण जागेवर दुरावस्थेत

असुन जिर्ण व पडक्या अवस्थेत आले आहे. अशा शाळेचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे यावर उपाययोजनाची माहिती मिळावे करीता प्रशासनराचे  उत्तर समाधानकारक नाही. प्रशासनातर्फे नागपूर म.न.पा. च्या शाळा संपुर्ण शहरात १० झोन अंतर्गत असुन शाळा इमारतीचे स्ट्रक्चर ऑडीट करण्यात आलेले नाही. आजपर्यंत ही शोकांतिका आहे परंतु ३० वर्ष जुणी इमारत असलेल्या शाळांची यादी तयार करण्यात आलेली असून स्ट्रक्चरल ऑडीट करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे हे उत्तर मला मिळाले आहे. मा.महापौरजी, अजुनही प्रशासनाव्दारे यावर कोणत्याही प्रकारचे निर्णय अथवा काम करण्यात आले नसल्याचे स्पष्ट झाले आहे. मग या शहरात कोणतीही दुर्घटना झाली त्यानंतरच प्रशासन जागा होईल काय ? प्रशासनाने मला यादी सुध्दा पुरविलेली नाही कोणत्या शाळेचे स्ट्रक्चर ऑडीट करावयाचे आहे याचा प्रस्ताव कधी सादर होणार आहे. याची सुध्दा माहिती प्राप्त झाली नाही. मा.महापौरजी, एखादया मा.सदस्यांनी प्रश्न विचारल्यानंतर प्रशासनाने यावर काम करावयास पाहिजे अशी कार्यपध्दती आहे असे प्रशासनाला मला म्हणावयाचे आहे. मा.महापौरजी, आजच्या आधुनिक शिक्षण पध्दतीने बरेच बदल घडत आहे. शिक्षणाची सुसज्ज इमारती सायन्स लॅब, ई- लायब्ररी, उत्कृष्ट स्पोर्ट, खेळाचे मैदान, सांस्कृतिक हॉल, स्वीमिंग पुल, स्पर्धा परिक्षा, करीअर मार्गदर्शन सर्व सुविधायुक्त सुसज्जित शाळा ईमारती बांधकाम होणे नागपूर म.न.पा. च्या शाळेत गरजेचे आहे. सर्वांचे लोकप्रिय नेते मा.केंद्रीय मंत्री, भारत सरकार श्री.नितीनजी गडकरी यांनी जे नागपूर शहरात सी.बी.एस.ई. शाळा सुरु करण्याचा मानस व स्पप्न साकार करीत असुन नागपूर शहराची गोर-गरीब जनतेला त्याचा लाभ मिळणार आहे.  करीता या शहराचा सर्व क्षेत्रात चेहरामोहरा बदलत असतांना शिक्षणाचे .बाजारीकरण न होता शहरातील गोर गरीब जनतेस समानतेचे शिक्षण मिळावे. वसुदेव कुटुंबाची संकल्पना लक्षात  ठेऊन शहरातील सर्व शाळांना उच्च दर्जा प्राप्त व्हावा अशी इच्छा माझी आहे. मा.महापौरजी, आपणही विद्यार्थी घडवित असल्याने या कार्याला आपला सदैव सहयोग राहील अशी माझी विनंती आहे. मनपाच्या शहरातील मोक्याच्या ठिकाणी असलेल्य शाळांची अवस्था जर्जर झाली आहे अनेक वर्षापासून देखभाल व मेटेनन्स नसल्याने पडण्याच्या अवस्थेत आहेत. सध्या शैक्षणिक दृष्टीने  मनपा शाळेत सुसज्ज वातावरण परिसर, मैदान व शिक्षक नसल्याने लोकांचा कल खाजगी शाळेकडे असतो पण मध्यमवर्गीय लोकांना तेथील अवाजवी  व न पेलणारी फी असल्याने त्यांच्या मुलांना चांगले दर्जेदार शिक्षण मिळत नाही त्यामुळे ते मागे राहतात. अशासाठी आपण प्रत्येक विधानसभा क्षेत्रात किमान एक दोन आधुनिक संसाधन युक्त शाळा निर्माण करुन देशात एक आदर्श मनपा म्हणुन ओळखले जाऊ. माफक फी  आणि दर्जेदार शिक्षण यामुळे गरजू लोकांना खूप फायदा  होईल यात शंकाच नाही. या शाळा तयार झाल्यावर मुलांच्या प्रगती पथावर व शिक्षकांवर सुध्दा लक्ष राहील. नवी दिल्लीत याच एक आदर्श उदाहरण आहे तेथे सर्व महानगरपालिका शाळा अत्याधुनिक करुन नाममात्र दरात फी आकारणी केली  त्यामुळे तेथे सर्व मध्यमवर्गीय मुलांना आधुनिक शिक्षण प्रणालीव्दारे खाजगी शाळा पेक्षा जास्त चांगले शिक्षण मिळत आहे आणि शाळेला विद्यार्थी आणि पैसाही मिळत आहे. मा.महापौरजी, मला बोलण्याची संधी प्राप्त करुन दिल्याबद्यल, धन्यवाद.

**<u>प्रश्न क्र २१८</u>** :-  नागपूर शहरातील या एकमात्र खासदार (काँग्रसच्या) स्व. अनुसयाबाई काळे यांच्या नावाने सुरु असलेल्या महिला समुपदेशन केंद्र या संदर्भात प्रश्न.

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

श्रीमती संगिता दिपक गि-हे :- मा.महापौरजी, माझा एक प्रश्न होता नागपूर शहरातील एकमात्र खासदार स्व.अनुसयाबाई काळे यांच्या नावाने झोन क्र १ ते १० मध्ये समुपदेशन केंद्र चालु होते. प्रशासनाकडुन उत्तर मिळाले की समुपदेशन केंद्र सध्या बंद आहे. मा.महापौरजी, प्रत्येक घरात जे घरगुती भांडणे होत असते ते पोलीस स्टेशनमध्ये न जाता आपल्या परिवारात सोडविण्याचे काम समपुदेशन केंद्रामधील महिला ते करीत होत्या. अतिशय उत्तम काम

त्या करीत होत्या त्यांनी कोरोनाच्या कार्यकाळामध्ये कोरोना सेंटरमध्ये जावून लोकांना समजिवण्याचे काम सुध्दा केले. परंतु प्रशासनाने त्यांना शाबासकी देण्याऐवजी समुपदेशन केंद्रच बंद केले. आपल्या मार्फेत माझी प्रशासनाला विनंती आहे की त्यांनी समुपदेशन केंद्र का बंद केले.

महापौर :- प्रशासनाने उत्तर दयावे.

उपायुक्त (श्री.राजेश भगत ) :- मा.महापौरजी, सदर समुपदेशन केंद्राला आपण ३१ मार्च पर्यत मुदतवाढ दिलेली आहे.

श्रीमती संगिता दिपक गि-हे :- मा.महापौरजी, समुपदेशन केंद्र सध्या स्थितीत चालु आहे काय ?

उपायुक्त (श्री. राजेश भगत ) :- मा.महापौरजी, सदर समुपदेशन केंद्र कोव्हीड काळामध्ये बंद होते मात्र आता ते सुरु करण्यात आले असुन ३१ मार्च पर्यत त्यांना मुदतवाढ दिलेली आहे.

श्रीमती संगिता दिपक गि-हे :-मा.महापौरजी, हे समुपदेशन केंद्र नियमित करण्यात यावे.

महापौर :- महिला समुपदेशन केंद्र नागपूर शहरामध्ये ज्या पिडीत महिला आहे त्यांच्यासाठी सुरु करण्याकरीता नागपूर महानगरपालिकेने पाऊल उचलले होते, नागपूर शहरातील एकुलती एक महिला सांसद स्व.अनुसयाबाई काळे यांच्या स्मृती प्रित्यर्थ हा प्रकल्प सुरु करण्यात आलेला होता. महिलांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी सोशल वर्कर महिला असावी, ॲडव्होकेट महिला असावी, आणि संस्था महिलांची असावी, या दृष्टीने हे नियोजन करण्यात आले होते याला भरपुर प्रतिसाद नागपूर शहरातील जनतेचा मिळाला आहे आणि अनेक महिलांना दिलासा मिळाला आहे. शासनाव्दारा संचालित भरोसा सेल जे पोलीसच्या माध्यमातून सुरु आहे त्यांचे लोकसुध्दा यांची कामगिरी कशी आहे ते पहायला नागपूर महानगरपालिकेमध्ये येऊन गेलेले आहे आणि यांची स्तुती केलेली आहे. हा प्रकल्प रेगुलर नागपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून सुरु राहिला पाहिजे. कोव्हीडचा काळ असल्यामुळे आपण ते बंद केले होते ती वेगळी बाब होती पुढे हे सुरळीत चालले पाहिजे त्या दृष्टीने प्रशासनाने आपली कार्यान्वयीन पध्दती सुरु ठेवावी.

**प्रश्न क्र २१९** :- नागपूर महानगरपालिकेने नागपूर शहरात २०१२ पासून कन्या स्त्रीभ्रुण हत्येच्या किती केसेस शोधल्या या संदर्भात प्रश्न.

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

श्रीमती दिव्या धुरडे :- मा.महापौरजी, मी प्रश्न टाकला होता की नागपूर शहरात २०१२ पासून कन्या स्त्रीभ्रुण हत्येच्या किती केसेस शोधल्या या संदर्भात प्रशासनाने मला कुठलेही उत्तर दिलेले नाही. या सोबतच माझा एक आणखी प्रश्न होता मा.महापौरजी आपण २०१३ मध्ये स्थायी समिती अध्यक्ष होते त्यावेळी आपण निर्णय घेतला होता की गरीब वर्गामध्ये ज्या मुलींचा जन्म होतो आणि जन्म झाल्याबरोबर आपण लाडली लक्ष्मी योजने अंतर्गत त्यांना लाभ देण्याच्या दृष्टीने आपण लाडली लक्ष्मी योजना २०१३ मध्ये सुरु केली. ही योजना सुरु केल्यानंतर मुलगी जेव्हा लग्नाची होते त्यामध्ये आधी ठरले होते की मुलगी २१ वर्षाची झाल्यानंतर तीला १ लाख २५ हजार रुपये दयायचे परंतु त्यामध्ये आता नविन निवीदा निघाल्या त्याप्रमाणे मुलगी २५ वर्षाची झाल्यानंतर तिला १ लाख ९० हजार रुपये लाडली लक्ष्मी योजनेअंतर्गत मिळणार आहे. या पुर्वी जे मा.आयुक्त आपल्या शहरात येऊन गेले त्यांनी बरेच निर्णय महानगरपालिकेचे बदलुन टाकले आणि त्यांनी ही योजना बंद केली. त्यांनी हे प्रयत्न केले की लाडली लक्ष्मी योजना ही पुर्णत: बंद होऊन जावी, परंतु आम्ही महिला बाल कल्याण समितीव्दारा त्यांना एक पत्र दिले होते त्यावेळी महिला बाल कल्याण समितीच्या मा.सभापती, संगिताताई सुध्दा होत्या, आमची पुर्ण समिती त्यांना भेटायला गेलो होतो, त्यावेळी त्यांनी ती योजना पुर्णपणे बंद केली नाही तर दिनांक ०१.०७.२०२० पासुन कुठलाही अर्ज त्यांनी घेतलेला नाही असे सांगितले त्यामुळे ती योजना पुर्णपणे बंद झालेला नाही. परंतु नविन ज्या मुलींचा जन्म झाला आहे त्यातील

कुठल्याही केसेस महानगरपालिका घेत नाही. त्यामध्ये मा.महापौरजी आपण निर्देश दयावे की, जी लाडली लक्ष्मी योजना सुरु झालेली आहे ती बंद होऊ नये आणि नागपूर शहरामध्ये ब-याच ठिकाणी प्रायव्हेट हॉस्पीटल आहे अजुनही तेथे स्त्रीभृण हत्या सुरु राहते यामध्ये नागपूर महानगरपालिकेने कुठेतरी निर्णय घ्यायला पाहिजे. आजपर्यत किती स्त्रीभृण हत्या झाल्या याची कुठलिही माहिती प्रशासनाकडे नाही. यामध्ये आपण आदेश दयावे की प्रशासनाने माहिती दयावी. लाडली लक्ष्मी योजनेमध्ये सध्यस्थितीत काय सुरु आहे याची सुध्दा माहिती दयावी.

महापौर :- प्रशासनाने उत्तर दयावे.

उपायुक्त (श्री. राजेश भगत ) :- मा.महापौरजी, महिला व बाल विकास विभागाव्दारे स्थायी समिती दिनांक २३.०६.२०१७ अन्वये त्या विषयाला मंजूरी प्रदान केली होती. परंतु तत्कालीन आयुक्त साहेबांनी त्यामध्ये निर्देश दिले होते त्याप्रमाणे नविन लाभार्थ्यांना आपण लाभ देत नाही. परंतु या आधी आपण ज्या लाभार्थ्यांना लाभ दिला आहे त्यांचे काम सुरु आहे.

महापौर :- लाडली लक्ष्मी योजना सुरु आहे किंवा नाही याची माहिती दयावी तसेच मा.सदस्यांचे म्हणणे आहे की नविन केसेस घेणे बंद आहे या संदर्भात माहिती दयावी.

उपायुक्त (श्री.राजेश भगत ) :- मा.महापौरजी, नविन केसेस घेणे बंद आहे परंतु ज्या जुन्या केसेस आहे त्यांचे रिन्युवेशन करणे सुरु आहे.

श्रीमती दिव्या धुरडे :- मा.महापौरजी, नविन केसेस घेणे का बरं बंद करण्यात आले याचे उत्तर दयावे.

उपायुक्त (श्री.राजेश भगत ) :- मा.महापौरजी, तत्कालीन मा.आयुक्त यांनी निर्देश दिले होते त्यानुसार सदर योजना केलेली होती. त्यामुळे जे नविन लाभार्थी आहे त्यांना लाभ दिला जात नाही. जे जुणे लाभार्थी आहे त्यांना लाभ मिळत आहे.

महापौर :- मा.सदस्यांचे स्पष्ट म्हणणे आहे की लाडली लक्ष्मी योजना का बर बंद करण्यात आली.

उपायुक्त (श्री.राजेश भगत ) :- मा.महापौरजी, तत्कालीन आयुक्तांनी तसे निर्देश दिले होते.

महापौर :- निर्देश देतांना काही कारणे नोंदविले आहेत काय ?

निगम आयुक्त :- मा.महापौरजी, ही एक प्रमियम बेस योजना आहे. सर्व्हे करीत असतांना यामध्ये कंपनीला फायदा झाला असल्याचे दिसुन येत आहे.

महापौर :- सर्वात अगोदर ही योजना काय आहे हे आयुक्त साहेबांना सांगण्यात यावे. कंपनीला किती फायदा झाला आणि लोकांना का बद फायदा झाला नाही हे सांगण्यात यावे आणि किती वर्षानंतर आपण फायदा देणार होतो हे सुध्दा सांगण्यात यावे. या योजनेसंदर्भात संपुर्ण माहिती दयावी. तुम्हाला माहिती नसेल तर निपाने साहेबांनी या योजने संदर्भात माहिती दयावी. यामध्ये आपण जे प्रिमीयम भरणार आहे त्यामध्ये वयाच्या कोणत्या वर्षी त्याचा लाभ मिळणार आहे.

अति.आयुक्त (श्री.निपाणे ) :- मा.महापौरजी, ही योजना सुरु झाली तेव्हापासून १९.०९.पर्यतचे सर्व प्रिमीयम भरायचे निश्चित झाले होते, आता माझ्याकडे पेपर नाही परंतु त्यामध्ये तत्कालीन आयुक्तांनी असे निर्देश दिले होते की, प्रमियमच्या मॅच्युरिटी नंतर ही रक्कम त्या मुलीचे जे वय ठरले आहे ते, प्रमियम भरणा-या रकमेपेक्षा अधिक रक्कम प्रमियमच्या रक्कमेपर्यत आपण गुंतवणुक करुन देऊ शकतो काय हे पाहुन त्याच्या पुढे योजना चालु ठेवता येईल किंवा नाही असे ठरले होते. दरम्यानच्या काळात जे जुने प्रमीयम आहे ते आणि चालु आर्थिक वर्षामध्ये जे अर्ज जमा झाले होते ते या सर्वांचे प्रमियम घेण्यासाठी आयुक्तांची मंजूरी घेऊन तेवढे प्रमियम भरलेले आहे. आता प्रमियम भरुन मुलीला जो लाभ मिळणार आहे तेवढाच लाभ आपण त्याच्यापेक्षा जास्त पैसे भरुन देऊ शकतो काय हे तयार

करायला सांगितले होते त्या दृष्टीने आता आपण तयार करीत आहे.

महापौर :- केव्हा आदेश देण्यात आला होता

अति.आयुक्त (श्री.निपाणे) :- मा.महापौरजी, ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवडयात या संदर्भात मिनीटस् फायनल झाले होते. आणि तो पर्यतचे सर्व प्रमियम आपण भरले आहे. ऑगस्ट पासुन पुढे म्हणजे त्याच्या पुढच्या ४ ते ५ महिन्याच्या केसेस आहे तेवढया आपण घेतलेल्या नाही.

महापौर :- आपण एक्झरसाईज केली आहे तर त्याचा आधार कोणता आहे त्या संदर्भात माहिती दयावी. आयुक्त साहेबांनी सभागृहात असे उत्तर दिले की कंपनीला फायदा होत आहे लाभार्थ्यांला याचा एक रुपयाचा फायदा होत नाही म्हणुन ही योजना बंद करण्यात आली. लाभार्थ्यांना कोणत्या महिन्यात फायदा होणार होता असे योजनेमध्ये नमुद आहे.

अति.आयुक्त (श्री.निपाणे ) :- मा.महापौरजी, योजनेचे माझ्याकडे डिटेल नाही. योजनेचे जे बेसिक प्रिंन्सीपल होते की लाभार्थ्यांना मॅच्युरिटीनंतर जी रक्कम मिळणार आहे प्रिमीयम भरण्यापासून त्या रकमेपेक्षा आपण त्या काळात जास्त रक्कम देऊ शकतो काय हे तपासुन घ्यायचे होते आणि आपण जास्त देता येणार असेल तर आपण त्या पध्दतीने योजना राबवु तशा प्रकारे त्यांनी निर्देश दिले होते.

श्रीमती दिव्या धुरडे :- मा.महापौरजी, तत्कालीन आयुक्तांनी योजना बंद करण्याचे निर्देश दिले आणि तुम्ही काय फायदा होणार आहे हे सांगत आहे आपण खोटी माहिती देता काय ?

अति.आयुक्त (श्री.निपाणे ) :- मा.महापौरजी, १९/०९ ला ही योजना थांबविली आहे तो पर्यतचे सर्व प्रमियम आपण भरले आहे. ज्या दिवशी मिनीटस् निघाले त्याच्या आधीच्या दिवसापर्यत सर्व प्रमियम भरले आहे.

श्रीमती दिव्या धुरडे :- मा.महापौरजी, कोणत्या तारखेपर्यत प्रमियम भरले आहे.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, ही योजना बंद करायला सांगितली होती याच्या मागचा हेतु काय आहे. नागपूर शहरातील बी.पी.एल. धारकांना या योजने अंतर्गत लाभ मिळायचा ज्यांच्या घरी मुलगी व्हायची आणि प्रमियम तपासून त्यांना जास्त मिळते की कमी मिळते हे बघण्यापेक्षा योजना बंद करण्यास यांना सारस्य होते. आपण योजनेची बदनामी करीत आहे की या योजनेमुळे ऐजन्टला फायदा झाला लाभार्थ्यांना फायदा झाला नाही हे खोटे आहे पण सभागृहातील एका सदस्यांनी किंवा माजी स्थायी समिती सभापती यांनी ही योजना सुरु केली होती त्या योजनेला कसे बदनाम करायचे आणि मी किती हुशार आहे. मी एक आय.ए.एस. किंवा आय.पी.एस. ची एक मोठी परिक्षा पास होऊन या सभागृहात आलेत आणि मी किती हुशार आहे आणि ही योजना बंद करुन कशी दुसरी योजना सुरु करु त्यामुळे आपण तात्काळ ही योजना चालु करण्याचे आदेश दयावे. आणि प्रशासनाला जर वाटत असेल या योजनेतुन प्रशासनाला फायदा होत नाही कंपनीला होते तर मा.आयुक्तांच्या माध्यमातून त्यांनी त्याची चौकशी करावी, प्रशासनाने १८-१८ समित्या केलेल्या आहेत आणि याची सुध्दा एक समिती तयार करुन घ्यावी परंतु पुढच्या ७ दिवसात या शहरातील गोरगरीब नागरिकांच्या घरी मुलगी जन्माला येईल आणि भविष्यात त्या मुलीचे नुकसाण होईल,त्यामुळे मा.महापौरजी आपण आदेश दयावे, मा.आयुक्तांनी त्यांच्या स्तरावर ही योजना तपासावी.

महापौर :- प्रशासनाने कृपया उत्तर दयावे, जेव्हा आयुक्तांनी निर्देश दिले या योजनेमध्ये महानगरपालिकेचे नुकसाण होत आहे व लाभार्थ्यांना सुध्दा लाभ मिळत नाही. याचा कॅलकुलेशनचा तक्ता नस्ती सोबत सादर केला आहे काय ? की प्रशासनाचे कसे नुकसाण होत आहे व लाभार्थ्यांना लाभ मिळत नाही. किंवा तशी काही रिपोर्ट सादर केली आहे काय ?

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, जुलै महिन्यात आदेश दिला आहे आणि हा फेब्रुवारी महिना आहे ऐवढया

दिवसात प्रशासनाने काय केले हे सुध्दा सांगावे. ६ महिन्याआधीचा हा प्रश्न आहे त्यामुळे ६ महिने प्रशासन काय करीत होते ? यांच्या नस्तीमध्ये तक्ता नाही, यांना योजना माहिती नाही.

उपायुक्त (श्री.राजेश भगत) :- मा.महापौरजी, या योजनेचा लाभ फेब्रुवारी २०२१ ते जानेवारी २०२२ पर्यत दयायचे निश्‍चित झाले आहे.

महापौर :- नविन केसेस घेत नाही असा आरोप सन्माननिय सदस्यांनी केलेला आहे आणि आपण २०२२ सांगत आहात यातील खरे काय आहे हे सांगण्यात यावे.

उपायुक्त (श्री.राजेश भगत) :- मा.महापौरजी, नविन केसेस घेणे बंद आहे हे बरोबर आहे. परंतु या योजनेच्या केसेसला नुतणीकरण करण्यासाठी मंजूरी दिलेली आहे. नविन व्यक्तीला आपण सध्या लाभ देत नाही कारण की तसे तत्कालीन आयुक्यांनी निर्देश दिले होते.

महापौर :- ही योजना कशी चुकीची आहे यासाठी नस्तीमध्ये काही तक्ता लावला आहे काय ? यामध्ये प्रशासनाने काही अहवाल दिलेला आहे काय, किंवा विभागाव्दारे काही अहवाल दिलेला आहे काय ?

श्री.विजय झलके :- मा.महापौरजी पॉइंट ऑफ इन्फॉर्मेशन, ज्या एजन्सीच्या माध्यमातून ही योजना कार्यान्वीत होत होती त्या एजन्सीचा किती फायदा झाला त्याची काही माहिती प्रशासनाजवळ उपलब्ध आहे काय ?

महापौर :- प्रशासनाने उत्तर दयावे.

उपायुक्त (श्री.राजेश भगत) :- मा.महापौरजी, प्रशासनाला किती फायदा झाला या अनुषंगाने कुठलिही माहिती उपलब्ध नाही.

श्रीमती दिव्या धुरडे :- मा.महापौरजी, सहा महिने आधीपासून विचारलेला हा प्रश्न आहे आणि प्रशासनाकडे कुठलिही माहिती उपलब्ध नाही.

श्री.प्रविण दटके :- मा.महापौरजी, प्रशासनाजवळ काहीच माहिती नाही. सहा महिने जुना हा प्रश्न आहे. एकीकडे प्रशासनाने किती पैसे खर्च केले आहे याची माहिती यांच्याकडे नाही. लाभार्थ्यांना किती फायदा झाला याची माहिती यांच्याकडे नाही. नागपूर शहरातील गोर गरीब लोक यापासून वंचित आहे हे दुर्देव आहे. आणि या योजनेकरीता स्थायी समिती सभापती यांनी प्रोव्हिजन सुध्दा केले आहे त्याकरीता मी त्यांना धन्यवाद सुध्दा देतो. माझे कुणाच्याही विरोधात मत नाही. एकीकडे सातवा वेतन लावायला वेळ आहे. विकास कामे करायला वेळ नाही. वर्कऑर्डर झालेले काम करण्याकरीता समित्यांवर समित्या, बैठकीवर बैठका एकीकडे लाभार्थ्यांना काय मिळणार आहे किंवा त्यांना आपण किती पैसे देऊ शकतो याचे एक गणित मांडले आहे. मी आपले अभिनंदन करेल की आपण स्थायी समिती अध्यक्ष असतांना ही योजना सुरु झाली आहे. एकीकडे जनतेचे प्रश्न दुर ठेवायचे,कर्मचा-यांना सातवा वेतन आयोग लावायचा, आणि नागरिक ज्या कामांसाठी टॅक्स भरतात त्या नागरिकांना याचा किंचतही फायदा मिळु नये,अशी भुमिका प्रशासनाची आहे याचा मी निषेध करतो आणि या सर्वांची चौकशी आयुक्तांनी आपल्या स्तरावर करावी, सात दिवसाच्या आत निर्णय घ्यावा, यावर जर मा.आयुक्तांचे काही मत असेल तर सभागृहात आपले मत मांडावे अशी माझी आपल्या माध्यमातून विनंती आहे.

महापौर :- मा.सदस्यांनी जो विषय मांडला आहे त्यातील हा एक भाग आहे. दुसरा भाग स्त्रीभृण हत्येबद्यल मा.सदस्यांनी विचारले होते त्याबद्यल सुध्दा प्रशासनाने आपली भुमिका स्पष्ट करावी.

वैद्यकीय अधिकारी (डॉ.चिलकर) :- मा.महापौरजी, या संदर्भात आरोग्य विभागाने समाजकल्याण विभागाला दि.१३/०७/२०२० रोजी उत्तर दिले होते. यामध्ये जे आहे गर्भधारणा किंवा प्रसुतीपुर्व गर्भ तंत्र पी.सी.पी.एन.डी.टी. अंतर्गत आपण २०१२ मध्ये आ णि २०१६ मध्ये अशा दोन मोहिम राबविल्या होत्या त्यामध्ये आपण २० केसेस केल्या

होत्या यामध्ये कोणाचेही स्त्रीभृण हत्येविषयची कारवाई निरंक आहे. आणि या विषयी कोणाचीही काही तक्रार नाही. नागपूर शहरामध्ये स्त्रीभृण हत्या झालेली नाही असे आपण सन्माननिय सदस्यांना कळविले देखील होते.

महापौर :- यांच्या प्रश्नातच यांचे उत्तर आहे. आणि जर दोघांना एकमेकांशी जोडले तर ज्या दृष्टीने आपण लाडली लक्ष्मी योजना सुरु केली होती त्याचा अर्थ हाच होता की स्त्रीभ्रुण हत्या बंद झाली पाहिजे. प्रशासनाने एकही केस स्त्रीभ्रुण हत्येचा दर्ज केला नाही याचाच अर्थ आहे की लाडली लक्ष्मी योजनाचा लाभ ऐवढा झाला की स्त्रीभ्रुण हत्या बंद झाली आणि प्रशासनाला स्त्रीभ्रुण हत्या हवेशी वाटत आहे त्या दृष्टीने लाडली लक्ष्मी योजना प्रशासनाने बंद केली असे निर्देशनास येत आहे. सुडबुध्दीने प्रशासनाने हा निर्णय घेतलेला आहे व लाभार्थ्यांना मिळणा-या लाभा पासून वंचित केलेले आहे. ही समाजकल्याणची योजना बंद करण्यापूर्वी कोणतेही निकष न ठरविता चुकीची भुमिका घेऊन प्रशासनाने हे निर्देश दिलेले आहे. हे सभागृह ते निर्देश त्वरीत रद्द करण्याचे निर्देश देते आणि जे लाभार्थी बी.पी.एल. कॅटेगिरीचे आहे. त्यांना पुर्वीपासून या योजनेचा लाभ मिळत होता तेव्हापासून जेवढे प्रलंबित केसेस आहे ज्यांची अप्लीकेशन आपल्याकडे प्रलंबित आहे त्यांची अप्लीकेशन सोबत घेऊन ताबडतोब त्यांनाही याचा लाभ दयावा,पुढे सुध्दा नागपूर महानगरपालिकेने जो पर्यत पर्यायी योजनेचा विचार महानगरपालिका अंतिम करीत नाही तो पर्यत ही योजना सुरु करावी. पर्यायी योजना आली तर त्या तारखेपासून आपण त्या दिशेने सुरुवात करु असे निर्देश हे सभागृह देते.

निगम आयुक्त :- मा.महापौर महोदय, सन्माननिय सदस्यांनी उपस्थित केलेले जे मुद्दे आहे की लाडली लक्ष्मी योजना का बंद करण्यात आली आहे त्या दृष्टीकोणातून प्रशासनातर्फे निट उत्तर देता आले नाही. ज्या पध्दतीने सन्माननिय सदस्यांनी सांगितले त्या दृष्टीकोणातून या विषयाच्या संदर्भात पुर्ण अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. या योजनेचे संपुर्ण डिटेल्स घेतल्यानंतर या पेक्षा चांगला पर्याय उपलब्ध होत असेल तर सभागृहासमोर घेऊन येऊ आणि यापेक्षा चांगला पर्याय नसेल तर या योजनांचा उपयोग चांगला असे तर त्या संदर्भात आपण निर्णय घेऊ, दोन्ही ऑप्शन ओपन ठेवायला पाहिजे. कारण कोणतेही निर्णय घेतांना ऑब्जेटीव्ह पध्दतीने निर्णय घेणे अपेक्षित आहे असे मला वाटते त्यासाठी सभागृहाने परवानगी दयावी. लाडली लक्ष्मी योजना अतिशय चांगली आहे ती अधिक प्रभावीपणे राबविण्याकरीता प्रशासन अभ्यास करुन सभागृसमोर येईल तसेच पुढच्या महिन्यात आपण बजेटला बसणार आहे त्यामध्ये आणखी चांगल्या प्रकारे आपण ती योजना राबवु या दृष्टीने त्याकडे बघण्याची आवश्यकता आहे. जो निर्णय आरबीट्रेली घेण्यात आलेला आहे तो मागे घेण्यास अडचण नाही आणि तो जर ऑब्जेक्टीव्ह पध्दतीने घेतला असेल तर तो नक्की आम्ही सभागृहासमोर घेऊन येऊ.

महापौर :- मा.आयुक्तांनी आता निवेदन केले त्या निवेदनात नमुद आहे याचा अभ्यास करण्याची गरज आहे. याचाच अर्थ असा आहे जेव्हा निर्णय घेण्यात आला तेव्हा अभ्यास न करता निर्णय घेण्यात आलेला आहे. अभ्यास करण्यासाठी कुठेही प्रतिबंध नाही आपण अभ्यास केला पाहिजे परंतु कोणतीही योजना बंद करण्यापूर्वी त्याचा पुर्ण अभ्यास झाल्यानंतर पर्यायी योजना आम्ही कोणती देत आहे ही ठरवुन घेतले पाहिजे, आपण ते न ठरविता लहान मुलींना मिळणारा लाभ होता तो आपण बंद केला आहे. आपण नविन योजना तयार करावी यासाठी काहीही प्रतिबंध नाही परंतु जो पर्यत नविन योजना तयार होत नाही तो पर्यत जुन्या पध्दतीने ही योजना सुरु ठेवावी, नविन योजना सभागृहाच्या समोर आणावी व ती योजना या मुलींच्या दृष्टीने या योजनेपेक्षा जास्त चांगली असेल तर त्या योजनेचा आपण नक्कीच विचार करु परंतु जो पर्यत नविन योजना आपल्याकडे येत नाही तो पर्यत जुनी योजना जशीची तशी सुरु ठेवावी, असे निर्देश देण्यात येते.

**प्रश्न क्र २२०** :- भांडेवाडी या डंपींग यार्डमध्ये संबंधित दोन्ही कचरा संकलन कंपनी संदर्भात प्रश्न.

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

श्री.विक्रम ग्वालबंशी :- मा.महापौरजी, माझा प्रश्न प्रशासनाशी होता की भांडेवाडी या डंम्पींग यार्डमध्ये कचरा संकलीत कंपनीव्दारे भ्रष्टाचार झाल्याचे वर्तमानपत्राच्या माध्यमातून निर्देशनास आलेले आहे.

महापौर :- कनेक्टीव्हीटीची तांत्रिक अडचण असल्यामुळे मा.सदस्य श्री.विक्रम ग्वालबंशी यांच्याशी संपर्क होवु शकत नाही.

**प्रश्न क्रमांक २२१** :- मौजा पारडी भांडेवाडी येथे आठवडी बाजाराकरिता आरक्षित जागा आहे का? ही जागा स्मार्ट सिटीकरिता देण्यात आली का? या संदर्भात प्रश्न.

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

**प्रश्न क्रमांक २२२** :- नागपूर शहरातील निर्जीव झाडे किंवा रस्त्यावर आलेल्या झाडांची विल्हेवाट लावण्यात आली का ? संदर्भात प्रश्न

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

श्रीमती परिणीता फुके :- मा.महापौरजी, माझ्या प्रश्नामध्ये झाडांचा विषय होता, नागपूर शहरातील निर्जीव झाडे किंवा रस्त्यावर आलेल्या झाडांची विल्हेवाट लावण्यांत आलेली आहे काय ? याच्यावर मला उतर देण्यांत आलेले आहे की विविध ठिकाणी झाडांचा सर्व्हे करण्यांत आलेले आहे त्यामध्ये एकुण ११७ निर्जीव झाडे आढळली आहे. या झाडांच्या संदर्भातील विषय वृक्ष संवर्धन समितीसमोर ठेवुन झाडे मुळासकट काढण्याची मंजूरी घेण्यांत येईल. तसेच रस्त्यावर आलेल्या धोकाधायक फांदयाच्या तक्रारीनुसार काढण्याची कार्यवाही करण्यांत येत आहे.मा.महापौरजी, मला आपल्याव्दारे प्रशासनाला विनंती करावयाची आहे कि, तुम्ही ११७ निर्जीव झाडे कुठल्याप्रकारे निवडली आहे. त्यावर आतापर्यंत कोणती कार्यवाही केलेली आहे, माझा हा प्रश्न आठव्या महिन्याचा होता आणि आता पर्यंत यांनी ११७ निर्जीव झाडांवर कार्यवाही केलेली आहे कि, तसाच माझा दुसरा प्रश्न होता कि, म.न.पा.च्या या झाडामुळे एखाद्या व्यक्तिची जिवितहाणी किंवा नुकसान झाल्यास काय कार्यवाही करण्यांत येते. मला असे उत्तर मिळाले आहे कि हा प्रश्न वस्तुनिष्ठ स्वरुपाचा असल्यामुळे याचे उत्तर देणे कठिण आहे. एकीकडे त्यांनी सांगीतले आहे कि ११७ निर्जीव झाडे असल्यामुळे समिती समोर हा विषय ठेवुन निर्णय घेण्यांत येईल. माझ्या प्रश्नाचे उत्तर देणे प्रशासनाला कठिण आहे. मला प्रशासनाला विचारावयाचे आहे कि झाडामुळे कोणाचा जिव गेला असेल तर याची जबाबदारी कोणाची असणार आहे. झांडांचा सर्व्हे कोणत्या प्रकारे करण्यांत येते, सर्व्हे केल्यानंतर कोणत्याप्रकारची कार्यवाही करण्यांत येते. या प्रश्नाची माहिती द्यावी, अशी मी आपणा मार्फत प्रशासनाला विनंती करते.

महापौर :- प्रशासनाने उत्तर द्यावे.

उद्यान अधिक्षक (श्री.चोरपगारे):- मा.महापौरजी, झाडांच्या सर्व्हेबद्यल......

श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, उपायुक्त यांनी उत्तर द्यावे. मा.महापौरजी, या विभागाचे उपायुक्त कोण आहे आणि एमएमसी ॲक्टप्रमाणे मा.आयुक्तांनी किंवा विभाग प्रमुखांच्या वरच्या अधिका-यांनी उत्तर द्यावे अशी नियमावली आहे. आयुक्त उत्तर देत नसतील तर त्या विभागाच्या उपायुक्तांनी उत्तर द्यावे.

महापौर :- उद्यान विभागाचे उपायुक्त म्हणुन दायित्व कोणाकडे आहे, श्री भेलावे साहेबांनी उत्तर द्यावे.

श्री. भेलावे (उपायुक्त) :- मा.महापौरजी,

महापौर :- श्री भेलावे यांचे संभाषण ऐकावयास येत नसल्यामुळे उद्यान अधिक्षक श्री.चोरपगारे यांनी उत्तर द्यावे.

उद्यान अधिक्षक (श्री.चोरपगारे):-:- मा.महापौरजी, .......

श्री विजय (पिंटु) झलके :- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, या विभागाचे जे उपायुक्त आहे त्यांच्याकडे योग्य माहिती असली पाहिजे.

महापौर :- मा.आयुक्तांनी उत्तर द्यावे.

निगम आयुक्त :- मा.महापौरजी, या प्रश्नामध्ये दोन मुद्दे मा.सदस्यांनी उपस्थित केले आहे. मा.सदस्यांनी प्रश्न विचारला होता कि किती निर्जीव झाडे आपल्या शहरामध्ये आहे. याच्यामध्ये संख्या दिली होती ११७ परंतु अजूनपर्यंत आपण ती झाडे काढलेली नाही. तसेच त्यामध्ये उपप्रश्न असा होता कि ही कोणाकोणाची जबाबदारी आहे, यामध्ये एक ट्री अॅथॉरीटी आहे, आपला एक मॅनडेट आहे, आपण झाडे वाचविण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करणार आहे. असे करीत असतांना ज्या ज्या लोकांचे कॉलेजेस असेल, किंवा हॉस्पिटल असेल किंवा इंस्टीटयुशन असेल त्यांच्याकडुन जे अर्ज येतात त्यावर आपण आपल्या बॉयलाजप्रमाणे त्यांना परवानगी देतो, तसेच मॅडमचा दुसरा प्रश्न होता कि झाडामुळे कोणाची जिवितहानी झाली तर हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे, या अनुषंगाने विचार करणे आवश्यक आहे.

श्रीमती परिणीता फुके :- मा.महापौरजी, मला बरोबर आयुक्तांचे म्हणणे ऐकायला आलेले नाही, परंतु आम्ही जेव्हा एखाद्या पत्राव्दारे कार्यवाही करण्यास सांगतो तेव्हा ते दहा-दहा महिने का होत नाही. माझ्या प्रभागामध्ये व्ही.एन.आय.टी.च्या परिसरामध्ये झांडांच्या फांदया मोठयाप्रमाणात वाढलेल्या आहेत, मी याबाबत पत्र दिल्यानंतर विभागाकडून त्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यांत येत नाही. माझा दुसरा प्रश्न होता कि, निर्जीव झाडांच्या संदर्भात मी तक्रार दिली आहे, ११७ झाडांचा सर्व्हे करण्यांत आला आहे, परंतु गार्डन विभागाकडून त्याच्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करण्यांत आलेली नाही, जर यामुळे कोणती जिवितहानी झाली तर आपण कोणती कार्यवाही करणार आहे.

निगम आयुक्त :- मा.महापौरजी, मॅडमनी जो तिसरा प्रश्न विचारलेला आहे, त्याचे कोणीच उत्तर देवु शकत नाही, कारण एखादया झाडामुळे काही हानी झाली तर त्याच्या सगळया गोष्टी तपासल्याशिवाय आम्ही जबाबदार आहोत किंवा कोणी व्यक्ति जबाबदार आहे, असे बोलणे चुकिचे ठरेल.

श्रीमती परिणीता फुके :- मा.महापौरजी, आपल्याला माहिती आहे कि ११७ निर्जीव झाडे आहे तरी त्याच्यावर आपण कोणतीच कार्यवाही केली नाही.

निगम आयुक्त :- मी सुरुवातीलाच सांगीतले कि, आपले पहिले कर्तव्य आहे, ट्री अॅथारीटी म्हणुन झाड वाचविणे ब-याच वेळी आपल्याकडे अर्ज येतात. नागरीक त्या झाडांना निर्जीव म्हणतात नंतर काही ट्रीटमेंट केल्यानंतर झाड वाचवु शकते, त्यामुळे आपण कटींग करण्यापूर्वी दहा वेळा विचार करतो आणि मॅडमचा दुसरा मुद्या होता की व्ही.एन.आय.टी.च्या झाडांच्या संदर्भात मला पुर्ण ऐकावयास आलेले नाही, मी मा.सदस्यांना विनंती करेल कि आपण या प्रकरणी माझ्याकडे यावे. यामध्ये आपण फांदया कट करण्याबाबत प्रॉपरली परवानगी देतो कुठल्याही प्रकारे अडी अडचणी येत नाही, परंतु ज्यावेळेस एकदम मुळापासून कट करण्याबाबत व्यक्ति परवानगी मागतात त्यावेळेस आपण दहा वेळा विचार करतो, त्यावेळेस आपल्याला कोर्टामध्ये उत्तर द्यावे लागते, त्याच्या जागा शोधाव्या लागतात. परंतु मॅडमनी जो मुद्या व्ही.एन.आय.टी.च्या संदर्भात उपस्थित केला आहे, त्याच्यामध्ये सार्वजनिक हित असल्याकारणाने ती बाब माझ्याकडे प्रत्यक्ष मॅसेजव्दारे सांगावी आपण ती बाब चेक करु. दुसरी महत्वाची बाब म्हणजे निर्जीव झाडांच्या संदर्भात झाडे वाचविण्यासाठी आपण प्रयत्न करतो. ज्याठिकाणी निर्जीव झाडे वाचविण्याच्या पलिकडे आहे, त्याठिकाणी आपण एक विशेष मोहिम घेवून येणा-या पावसाच्या आधी ही सगळी झाडे कश्याप्रकारे कट करण्यांत येतील त्याबाबत मी सूचना देईल.

श्रीमती परिणीता परिणय फुके :- मा.महापौरजी, आपण पावसाळा येईपर्यंत वाट पहायची काय ? आधी सांगावयास पाहिजे कि कोणत्या महिन्यात आपण ही कार्यवाही सुरु करणार आहे. आपण कोणाचे जीव जाण्याची वाट बघणार आहे काय ? कि त्याच्यापूर्वी हे करणार आहे.

श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, पाईंट ऑफ आर्डर, आपल्या व माझ्या प्रभागाच्या मधात एक झाड होते ते झाड कोणाचीही परवानगी न घेता तोडण्यांत आले, पाताळेश्वर रोडवर ते झाड होते आणि आपल्या विभागाने ते झाड कापण्याची परवानगी दिली होती अशी मला माहिती मिळाली आहे. मी त्याबाबत विचारणा केली होती आणि त्याचा फोटो सुध्दा मा.आयुक्तांना व्हॉटस अॅपवर फॉरवर्ड केला आहे. मा.महापौरजी, दुसरे असे कि, या विभागाच्या वतीने लॉकडाउनच्या काळात विविध विभागाच्या माध्यमातुन झाडे लावली आहे अशी माहिती आहे, दुसरे एन.आय.टी.कडून परस्पर काही गार्डनचे आपण हँडओव्हर केले त्यांच्या कॉन्ट्रक्टरच्या माध्यमातुन प्रशासनाने आपल्या स्तरावर कारवाई केली अशी माहिती आहे तो विषय सभागृहात आणण्यांत आलेला नाही. या सर्व विषयाची माहिती उक्त अधिका-यांनी द्यावी, अशी माझी आपणा माध्यमातुन विनंती आहे.

महापौर :- आपण एक एक विषय घेवु, पहिल्या विषय असे आहे की, पाताळेश्वर रोडवर जे झाड कापण्यांत आले त्याबाबत प्रशासनाने उत्तर द्यावे.

उद्यान अधिक्षक (श्री.चोरपगारे) :- मा.महापौरजी, लवकर या अनुषंगाने कार्यवाही करण्यांत येईल.

श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, लवकर म्हणजे केव्हा कार्यवाही होणार आहे, लवकर म्हणजे या शब्दाचा अर्थ काय आहे.

महापौर :- श्री चोरपगारेजी आपले म्हणणे ऐकावयास येत नाही. मा सदस्य श्री दटके साहेबांचे हे म्हणणे आहे कि एक महिना झाला तक्रार करुन आपण कार्यवाही कोणत्या तारखेला करणार आहे.

श्री प्रविण दटके :- आपल्या अधिका-यांच्या समोर आपल्या कंत्राटदारांनी आपल्या कर्मचा-यांच्या मदतीने ते झाड मुळासकट कापले आहे. एकीकडे आपण झाड लावण्याची कार्यवाही करतो व दुसरीकडे आपले अधिकारी झाड मुळासकट कापण्याची परवानगी देतात.

महापौर :- उद्यान अधिक्षक श्री.चोरपगारे जे उत्तर देत आहे ते कॉंट्रॅडेक्टरी आहे, झाड कापण्याच्या संदर्भात आपण एफ.आय.आर. दाखल केली आहे, सोबतच मा.दटके साहेबांचे असे म्हणणे आहे कि आपल्या ॲथाराईज ठेकेदारांनी अधिका-यांच्या उपस्थितीतच झाड कापले आहे. तर ही सभागृहाची भुल करण्याचा विषय आहे, आयुक्तांनी व्यक्तिश: याची चौकशी करावी. आणि याच्यात जे दोषी असेल त्याच्यावर त्वरीत आयुक्तांनी कार्यवाही करावी. दुसरा विषय दटके साहेबांनी विचारला कि, लॉकडाउनच्या काळात भांडेवाडी येथे ए.डी.टी.पी.कडून आपण जेव्हा नकाशे मंजूर करुन वृक्ष लावण्याकरिता पैसे घेतो त्या एक कोटी रुपयांची वृक्ष लागवड आपण भांडेवाडी परिसरात केली आहे, अशी त्यांची माहिती आहे. ही बाब खरी आहे किंवा खोटी आहे, कृपया सभागृहाच्या समोर प्रशासनाने याचे उत्तर द्यावे.

उद्यान अधिक्षक (श्री.चोरपगारे) :- मा.महापौरजी, भांडेवाडी येथे म.न.पा.च्या जागेवर झाडे लावण्याकरिता वृक्ष प्राधिकारीणी समिती समोर प्रस्ताव ठेवण्यांत आले होते. त्याप्रमाणे १५,५०० झाडे लावण्यांत आलेले आहे.

श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, या कामाचे टेंडर करण्यांत आले होते काय ? कुठल्या दिवशी हा टेंडर पेपरमध्ये आला होता, ऑनलाईन आला होता कि ऑफ लाईन आला होता, त्याची सबमिशन डेट कोणती होती, जर हा ७० लक्ष रुपयांचा टेंडर होता तर हा विषय मा.सभापती, स्थायी समिती समोर प्रशासकीय मान्यता करिता पाठविण्यांत आला होता काय ? याची माहिती सादर करण्यांत यावी.

उद्यान अधिक्षक (श्री.चोरपगारे) :- मा.महापौरजी, यामध्ये तीन वेगवेगळे टेंडर होते,

महापौर :- वृक्ष लागवडीसाठी आपण जो टेंडर करतो, त्याची जुनी पध्दत काय होती. त्याच्यात मटेरीअलचा वेगळा, लागवडचा वेगळा आणि संवर्धनाचा वेगळा असा करतो काय ? यापूर्वी असे काही टेंडर केले आहे काय ?

उद्यान अधिक्षक (श्री.चोरपगारे) :- मा.महापौरजी, असे आपण करीत नाही, परंतु तत्कालीन मा.आयुक्तांनी निर्देश दिल्यामुळे हे काम करण्यांत आले.

महापौर :- म्हणजे एका टेंडरचे आपण तीन पार्ट करतो काय ? एक टेंडरचे आपण तीन तुकडे केले आहे हे खरे आहे हा विषय स्थायी समितीपुढे नाही गेला पाहिजे म्हणुन हे केले आहे काय ? आयुक्तांनी या संपुर्ण प्रकरणाची चौकशी करावी.

श्री प्रविण दटके :- मा.महापौरजी, माझी आपणांस विनंती आहे कि या विषयाची चौकशी होण्याआधी ७२ क या नियमांतर्गत चोरपगारे यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करण्यांत यावी. आणि येणा-या सात दिवसात आयुक्तांनी आपल्या स्तरावर किंवा जो कोणी अधिकारी उपायुक्त असेल त्याच्या स्तरावर कार्यवाही करुन याचा रिपोर्ट सभागृहासमोर ठेवावा. तोपर्यंत श्री.चोपरपगारे यांना सक्तीची रजा किंवा तात्काळ निलंबित करावा. अशी माझी आपल्याला विनंती आहे.

महापौर :- संबंधित सदस्यांनी जो प्रश्न उचलला आणि ज्याप्रमाणे प्रशासनाने उत्तर दिले हे अत्यंत गंभीर बाब आहे. कोणतीही वृक्ष लागवड करीत असतांना वृक्ष लाऊन घेणे आाणि त्याचे संवर्धन करणे हा एकत्रित विषय असतो तीन टेन्डर करणे म्हणजे एक खड्डा करेल, दुसरा वृक्ष पुरवेल आणि तिसरा त्याचे संवर्धन करेल ही बाब पहिल्यांदाच महानगरपालिकेत दिसत आहे. हा प्रत्यक्षदर्शी झालेला घोळ आहे. कोणत्याही माणसाला काम मिळुन देण्याच्या दृष्टीने करण्यात येणारा प्रयत्न यातुन दिसुन येते. काही काम करीत असतांना मॅन्युपुलेशन करण्याच्या दृष्टीने करण्यात आलेली बाब प्रथमदर्शी लक्षात येते या दृष्टीने सन्माननिय सदस्यांनी सभागृहासमोर जो विषय मांडला आहे त्यावर ७२ (क) प्रमाणे आयुक्तांनी यावर कारवाई करावी. आयुक्तांनी संबंधित जो दोषी माणुस आहे त्यावर ७ दिवसाच्या आत कारवाई करावी. आणि ७ दिवसाच्या आत कारवाई करुन पुढच्या सभागृहात ती कारवाई सभागृहाच्या पटलावर आणावी. त्यामध्ये जो कोणी दोषी आहे त्यामध्ये दुस-यांदा अशाप्रकारचे कृत्य नाही झाले पाहिजे या दृष्टीने आपण यात कठोर निर्देश दयावे, जर कोणी असा प्रयत्न करेल तर त्याच्यावर टर्मीनेशनची कारवाई पुढे करण्यात येईल अशा प्रकारचे सक्त निर्देश यामध्ये देण्यात यावे.

निगम आयुक्त :- मा.महापौरजी, यामध्ये ७२ (क) प्रमाणे कारवाई करण्याची आवश्यकता आहे काय ? याची तपासणी करण्यात येईल, यामध्ये सखोल चौकशी झाल्याशिवाय ७२ (क) ची कारवाई करणे उचित राहणार नाही.

महापौर :- निगम सचिवांनी मनपा अधिनियमातील कलम ७२ (क) चे वाचन करावे.

निगम सचिव:- मा.महापौरजी, ७२ 'क' च्या अंतर्गत शिस्तभंगाची कार्यवाही

१) प्रत्येक महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी त्यास नेमुन दिलेले व त्याच्याशी संबंधित असलेले शासकीय कर्तव्य व शासकीय काम अत्यंत दक्षतेने आणि शक्य तितक्या शिघ्रतेने पार पाडण्यास बांधील असेल परंतु साधारणपणे कोणतीही फाईल महानगरपालिकेच्या कोणत्याही विभागातील कोणत्याही महानगरपालिका अधिका-याकडे किंवा कर्मचा-याकडे ७ दिवसाच्या कामाच्या दिवसापेक्षा......

श्री.प्रवीण दटके:- मा.महापौरजी पाईंट ऑफ आर्डर. पहिल्याच वाक्यात हा सगळा संदर्भ दिला आहे. ७ दिवसापर्यंत फाईल प्रलंबित राहिली नाही पाहिजे. पुर्ण कायद्या आम्हांला पाठ आहे. आम्हांला सांगण्याची आवश्यकता नाही. महानगरपालिकेने ७२ 'क' च्या अंतर्गत सस्पेंड केले आहे हीच महानगरपालिका आहे. त्यामुळे आपण दिलेल्या

निर्देशाचे, आपण दिलेल्या आदेशाचे  पालन प्रशासनाने करावे.

निगम आयुक्त:- मा.महापौरजी, ७२ 'क' ची आवश्यकता असेल तर नक्की करेल. पहिले त्याच्यामध्ये सर्व प्रकारची तपासणी करुन घेणे आवश्यक आहे.

महापौर :- कलम ७२ (क) चे वाचन निगम सचिवांनी केल्यानंतर त्यामध्ये प्रथमत: शिस्तभंग असा शब्द नमुद आहे आणि ज्या प्रमाणे प्रशासनाकडुन उत्तर देण्यात आले त्या उत्तरामध्ये प्रथमदृष्टया लक्षात येते की एका इमारतीचे बांधकाम करायचे असेल तर लोखंड खरेदीचे टेंडर वेगळे, विटा खरेदीचा टेंडर वेगळे, आणि बांधकाम करण्याचे टेंडर वेगळे आपण काढु शकत नाही. एका कामाचे तिन तुकडे करु शकत नाही तसा हा भाग आहे ज्या प्रमाणे प्रशासनाच्या माध्यमातून उत्तर देण्यात आले त्यामधुन असे दिसते जर असे झाले असेल तर हा शिस्तभंगच आहे. हे प्रथमदृष्टया निदर्शनास येते म्हणुन यामध्ये आपण ७२ (क) प्रमाणे कारवाई करावी. जर प्रशासनाला वाटत असेल यामध्ये ७२ (क) लागु होत नाही तर प्रशासनाने आपल्या अहवालामध्ये नमुद करुन या सभागृहाच्या पटलावर ठेवावा व त्याच्यावर सभागृह हा पुढचा निर्णय घेईल. तिसरा विषय मा.दटकेजींनी विचारला होता एनआयटीचे गार्डन आपण घेतले आहे काय? जो कंत्राटदार तेथे काम करत होता त्यालाच मेंटेंन्ससाठी अधिकार दिले आहे हे खरे आहे काय?

श्री.विजय झलके:- पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी,  या अनुषंगाने आपल्याला माहिती देवू इच्छितो की कोव्हीडच्या दरम्यान आयसोलेशन हॉस्पीटल आणि आयजीआर गांधीनगर आयजीआर इमारतीचे सुध्दा तुकडयामध्ये काम करुन जाणीवपुर्वक ती माहिती स्थायी समितीला मिळाली नाही पाहिजे म्हणून प्रशासनाने जाणीवपुर्वक कामाचे तुकडे करुन काम केले. हे कोव्हीडच्या काळात काम झाले. त्यामुळे कोव्हीडच्या काळात जे जे काम झाले त्या सर्व कामाच्या संदर्भात हा प्रश्न निर्माण होत आहे. जसा झाड लावण्याच्या संदर्भात हा प्रश्न निर्माण झाला त्याच सारखा प्रश्न इमारतीच्या बांधकामाच्या संदर्भात, रस्त्याचे टेंडर केले, बांधकामाचे टेंडर केले त्यातही असे झालेले आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे.

महापौर:- याच्यावर मी बोलेल परंतु जो गार्डनचा विषय आहे त्या विषयावर प्रशासनाने उत्तर दयावे. एनआयटीच्या गार्डनचा काय विषय आहे तो सभागृहाच्या पटलावर आणावा.

उद्यान अधिक्षक (श्री.चोरपगारे) :- मा.महापौरजी, तत्कालीन आयुक्त यांनी निर्देश दिले होते.

महापौर:- आवाज येत नाही आहे.

श्री.तानाजी वनवे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी. या संदर्भातील नंदलाल कमेटीचे डायरेक्शन होते. कोणतेही काम तुकडे करुन करण्यात आले ती ही शिस्तभंग होते. यावर गंभीर कार्यवाही केली जावू शकते. नागपूर महानगरपालिकेत क्रीडा घोटाळयामध्ये अनेक लोकांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते. हे गंभीर प्रकरण आहे. एका कामाचे तुकडे करुन या पध्दतीने काम होत असेल तर ही अत्यंत गंभीर बाब आहे याची दखल घेतली पाहिजे.

महापौर:- आपण याच्यात रुलिंग दिलेली आहे. प्रशासनाचे म्हणणे आहे ७२ (क) लागू होत नाही. आपण त्यांना सुटही दिली आहे की कसा लागू होत नाही ते नमुद करावे. प्रशासनाने दिलेल्या अहवालावर आपण सभागृहात चर्चा करुन निर्णय घेवू. विरोधी पक्ष नेता साहेब, आपण आदेश दिले आहे. ७२ (क) प्रमाणे कार्यवाही करण्यासाठी निर्देश दिले आहे. प्रशासन याची चौकशी करेल जर त्याच्यात ७२ (क) बसत नसेल तर प्रशासन कार्यवाही करेल आणि जर ७२ (क) प्रमाणे कार्यवाही केली नाही तर कां केली नाही ते आपल्या अहवालामध्ये नमुद करेल. पुढच्या सभागृहामध्ये आपण यावर फायनल डिस्कशन करुन निर्णय घेवू. परंतु तोपर्यंत एनआयटीच्या बगीच्याचा विषय आहे त्यावर प्रशासनाने उत्तर दयावे.

उद्यान अधिक्षक (श्री.चोरपगारे) :- मा.महापौरजी, तत्कालीन आयुक्त यांनी निर्देश दिले होते त्याप्रमाणे

एनआयटीच्या गार्डनची देखभाल जुन्या कंत्राटदाराकडून करुन करण्यात येत आहे.

महापौर:- आयुक्तांचे या विषयावर लेखी आदेश आहेत काय?

उद्यान अधिक्षक (श्री.चोरपगारे) :- मा.महापौरजी, तत्कालीन आयुक्तांनी लेखी आदेश दिले नव्हते.

श्री.प्रवीण दटके:- पाईंट ऑफ आर्डर, कोणतेही लेखी आदेश तत्कालीन आयुक्तांनी दिले किंवा नाही. तत्कालीन आयुक्तांना प्रशासनातील तत्सम अधिकारी बदनामी करीत आहे असा माझा आरोप आहे. जर लेखी आदेश दिलेला नाही तर कुठेही स्थायी समिती स्तरावर, आयुक्त स्तरावर, महापौर स्तरावर कोणतीही कार्यवाही होत नसेल तर महानगरपालिका त्याच कंत्राटदाराला काम देवू शकते काय? ते मा.आयुक्त यांनी किंवा तत्सम अधिकारी यांनी माहिती घेवून सभागृहाच्या पटलावर ठेवावे अशी माझी मागणी आहे.

महापौर:- चोरपगारे साहेब तत्कालीन आयुक्तांनी कोणत्या तारखेला हा निर्देश दिला होता. प्रशासनाने उत्तर दयावे की कोणत्या तारखेला या प्रकारचा आदेश संबंधित आयुक्तांनी दिला होता. हा विषय कधी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे काय? जर सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला होता तर सभागृहाने यावर काय भुमिका घेतली होती हे प्रशासनाने सभागृहाच्या निदर्शनास आणून दयावे.

श्रीमती परिणिता फुके:- पाईंट ऑफ इन्फोर्मेशन मा.महापौरजी. मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की गार्डन विभागाकडे असा कुठला फॉरमेट आहे काय? जे गार्डन आपण मेंटेंन्सकरिता देत असतो जे टेंडर न होता डायरेक्ट कंत्राट बेसिकवर जातात ते कुठल्या बेसिसवर गार्डन डिपार्टमेंट ठरविते.

श्रीमती आभा पांडे:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी. नागपूर सुधार प्रन्यासचे ५४ उद्याने आहेत. ते उद्याने महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केले. हस्तांतरीत केल्यानंतर आपली कॅपिसिटी होती. आपण सक्षम होतो म्हणून त्यांनी आपल्याकडे दिले आहे. प्रशासनाने स्विकारले म्हणजेच आपण सक्षम होतो असे माझे म्हणणे आहे. मा.महापौरजी, त्याची इच्छा झाली तेव्हा त्यांनी दिले, आपली इच्छा राहिली तर आपण घेवू यामुळे बरेच उद्यानांचे भवितव्य खराब झाले आहे. आपण त्या ठिकाणी सुधारणा करु शकत नाही. महानगरपालिकेत विचारले तर ते एनआयटीकडे बोट दाखविते आणि एनआयटीमध्ये गेले आणि विचारले तर ते म्हणतात की हे महानगरपालिकेला हस्तांतरीत झालेले आहे. एक निवेदन करु इच्छिते मा.महापौरजी, आपल्याला उद्याने महानगरपालिकेकडे ठेवावयाचे आहे तर त्याचे नियोजन आपण कुठल्या स्तरावर करीत आहे.

श्री.प्रवीण दटके:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी. त्या कंत्राटदाराला कंत्राट दयावे किंवा नाही याच्यामध्ये माझा काही विरोध नाही. माझा मुद्दा असा की याची प्रोसेस काय ? नियम, कायद्यात काय दिलेले आहे, सभागृहात विषय आणला आहे काय? ताईने म्हटले बगीच्याचे मेंटेंन्स करावे , दहा वेळा प्रोसीजर करुन देवून टाकावे. परंतु महानगरपालिकेने त्याचे पैसे भरावे, त्याचे बील भरावे, माझा ताईच्या प्रश्नाला विरोध नाही. परंतु त्याची प्रोसीजर काय आहे. ताईने म्हटले तर प्रोसीजर सांगण्यात येत नाही आणि यांनी आपल्या स्तरावर ७०-७० बगीचे देवून टाकले.

श्री. संदीप जोशी:-पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, माझ्या प्रभागातील सावरकर नगर उद्यान आहे. मागील एक महिन्यापूर्वी या उद्यानाची इतकी दुरावस्था झालेली असल्यामुळे मी चोरपगार साहेबांना बोलाविले होते. त्या उद्यानाचा सत्यानाश झालेला आहे. आठ महिने झाले एनआयटीच्या एक प्रायव्हेट कंत्राटदाराला त्याचे काम दिले. त्याचे काम दिल्यानंतर सध्याच्या स्थितीत त्यांची अत्यंत भयंकर परिस्थिती झाली आहे. एनआयटी कधी लोकाभिमुख निर्णय घेवून काम करीत नसते. कुठेतरी पैश्याचा व्यवहार करण्यासाठी कंत्राटदाराला काम दिले आहे. आज सात-आठ महिने झाले तेथे नर्सरीचे काम झाले आहे आणि आता व्यावसायिकीकरणाचे काम सुरु झाले आहे. त्या ठिकाणच्या नागरिकांचा याला प्रचंड विरोध आहे. चोरपगार जेव्हा आले तेव्हा त्यांनी सांगितले की नागपूर सुधार

प्रन्यासकडून ते महानगरपालिकेला हस्तांतरीत झाले नाही. मी नागपूर सुधार प्रन्यासच्या सभापती महोदयांची भेट घेतली त्यांनी स्पष्टपणे पत्र दिले आहे. ते चार महिन्यापूर्वी पत्र दिले होते आणि ते महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्यात आले होते. एकीकडे नागपूर सुधार प्रन्यास म्हणते हस्तांतरीत झालेले आहे आणि त्या ठिकाणी व्यावसायिकरण करणे सुरु झाले आहे. अशा पध्दतीने जेवढे उद्यान असतील तात्काळ त्याची पॉलिसी तयार करण्यात यावी. या उद्यानाचे व्यावसायिकीकरण बंद करण्यात यावे. एनआयटीने हे जे धंदे सुरु केले आहे ते तात्काळ बंद करण्यात यावे. महानगरपालिकेने लोकाभिमुख निर्णय घेवून या ठिकाणी दिलेले सर्व कंत्राट रद्द करुन नवीन धोरणाप्रमाणे निर्णय घेण्यात यावा अशी मी विनंती आपल्याला करीत आहे. एकंदरीत जेवढे उद्यान असतील त्या उद्यानामध्ये लोकाभिमुख निर्णय घेवून महानगरपालिका ती चालवित असेल तर त्या पध्दतीची पॉलिसी तयारकरण्यात यावी. ते कंत्राट रद्द करुन निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो.

महापौर:- ७० गार्डनच्या संदर्भात प्रशासनाने हा जो निर्णय घेतला हा सभागृहाच्या पटलावर न घेऊन घेतलेला निर्णय आहे. कोणतेही प्रॉपर्टी महानगरपालिका जेव्हा ॲडॉप्ट करते त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार या सभागृहाला आहे. तसे न करता हा घेतलेला निर्णय आहे त्यामुळे सभागृह असे निर्देश देते की एन.आय.टी. कडुन महानगरपालिकेकडे कोणताही लेखी आदेश न देता घेण्यात आलेला हा निर्णय आहे त्यामुळे हे सर्व गार्डन एन.आय.टी. कडे त्वरीत परत करावे. सोबतच याच्यात जे कंत्राटदार काम करीत आहे त्याचे पेमेंट सुध्दा एन.आय.टी. देईल, नागपूर महानगरपालिकेला ते देय राहणार नाही या दृष्टीने हे सभागृह निर्देश देते. याच्या सोबतच जर एखादया अधिका-यांनी घेतलेल्या चुकीच्या निर्णयामुळे महानगरपालिकेच्या सभागृहाची जर अवहेलना होत असेल तर त्या दृष्टीने मा.आयुक्तांना निर्देश देण्यात येते कोणी जर प्रशासनिक बाब पुर्ण न करता व्यक्तीगत स्तरावर काही निर्णय घेत असेल एकीकडे महानगरपालिकेच्या अनेक कामांना आर्थिक स्थिती बरोबर नाही म्हणुन काम थांबविण्यात आलेले आहे आणि दुसरीकडे आपण ७० गार्डन दत्तक घेत असाल तर हे सेल्फ कॉंट्रॅडक्टरी आहे. स्वत:च्या विषयाच्या विरोध करण्यासारखा विषय आहे. एकीकडे महानगरपालिकेचे हयातीमध्ये असलेल्या गार्डनमध्ये काम करण्यासाठी निधी उपलब्ध नाही आणि दुसरीकडे आम्ही दुस-याचे मुले पोसण्यासाठी तयारी दर्शवितो हे प्रथमदृष्टया चुकीची बाब दिसते म्हणुन मा.आयुक्तांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करावी, याच्यात जे दोषी आहे त्यांच्यावर उपलब्ध नियमाप्रमाणे कारवाई करावी, मी याच्यात कोणत्याही कलमांचा उल्लेख करीत नाही. कारण मी कलमांचा उल्लेख केल्यानंतर आयुक्त साहेबांना असे वाटते की त्यांच्या अधिकारामध्ये काही अतिक्रमण तर करीत नाही. म्हणुन मी कोणत्याही कलमांचा निर्देश देत नाही परंतु हे प्रथमदृष्टया चुकीचे दिसत आहे. आणि कोणताही आयुक्त तो महानगरपालिकेचा आयुक्त आहे. महानगरपालिकेचा कार्यान्वयन अधिकारी आहे. महानगरपालिकेचा सखोल विश्वास त्या माणसांवर असतो. आदेश देत असतांना लेखी आदेशच दिले पाहिजे. आणि कोणत्याही अधिका-यांनी कोणत्याही आयुक्तांच्या तोंडी आदेशाप्रमाणे निर्णय घेणे हे भरपुर अपराधिक कृत्य आहे. त्या दृष्टीने या प्रकरणाकडे बघण्यात यावे, त्वरीत ७० गार्डन परत करण्यात यावे. ते मेंटेनन्सचे पैसे एन.आय.टी. देतील असा निर्णय हे सभागृह घेते, सोबतच मा.सदस्या सौ.परिणिता फुके यांनी जो विषय मांडला आहे की पावसाच्या पुर्वी वाढलेल्या झाडांची कटींग करण्यासाठी नियुक्त केलेले कंत्राटदार हे काम करतील काय, त्यांची तारीख काय आणि त्यांचे नावे काय हे कृपया प्रशासनानी सभागृहाच्या निर्देशनास आणुन दयावे.

निगम आयुक्त:- ॲडशनल कमिश्नरने याच्या संदर्भात सखोल तपासणी करुन त्याचा रिपोर्ट पुढच्या सभागृहात देण्यात यावा.

महापौर:- परिणिता ताईचे मुळ प्रश्नाचे उत्तर येवू दयावे.

श्रीमती परिणिता फुके:- मा.महापौरजी, माझा प्रश्न आहे जे गार्डन आपण मेंटेंन्सकरिता देत असतो जे टेंडर न होता डायरेक्ट कंत्राट बेसिकवर जातात ते कुठल्या बेसिसवर गार्डन डिपार्टमेंट ठरविते. आणि गार्डन मेंटेंन्सला दिल्यानंतर त्याची माहिती नगरसेवकांना दिली जाते काय?

महापौर:- ताईचा प्रश्न आहे जे लहान गार्डन महानगरपालिकेचे जे मेटेंन्सकरिता देतो त्याची प्रोसेस काय? आणि मेंटेन्सला दिल्यानंतर त्याची माहिती नगरसेवकांना असते किंवा नाही. प्रशासनाने उत्तर दयावे. अगदी सोपा प्रश्न आहे. प्रशासनाने उत्तर दयावे.

श्रीमती परिणिता फुके:- मा.महापौरजी, मला असे वाटते की रुल्स् फॉलो केल्या जात नाही. डायरेक्ट कंत्राटदाराला देतांना त्याची काही प्रोसेस असावी असे मला काही वाटत नाही.

निगम आयुक्त:- याच्यात सर्वात महत्वाचे जे काही टेंडर झाल्यानंतर त्याचे डिटेल्स् आहे ते आपल्याकडे न ठेवता आपले स्थानिक प्रतिनिधी आणि कॉमन पब्लिक सगळयांना कळायला पाहिजे. पाहिजे असेल तर गार्डनमध्ये बोर्ड ठेवा. त्या गार्डनचा कोणत्या वर्षाचा देखरेखचा कंत्राट कोणत्या कंत्राटदारेकडे देण्यात आले आहे त्याचे संपुर्ण डिटेल्स देण्यात यावी तेथील स्थानिक प्रतिनिधींचा सुध्दा याची माहिती देण्यात आली पाहिजे.

श्रीमती परिणिता फुके:- मा.महापौरजी, छोटे गार्डनचे कंत्राट निघत नाही आणि डायरेक्ट कंत्राट दिला जातो. याची प्रोसेस आहे याची माहिती दयावी.

श्री.जलज शर्मा (अति.आयुक्त):- मा.महापौरजी, मा.सदन. कोणत्याही गार्डनच्या मेंटेंन्ससाठी आम्ही दरवर्षी कॉन्ट्रक्ट करतो. त्या वर्षी जे जे लागणार आहे त्याचे नियोजन जे मनुष्यबल आणि लेबर आहे, मटेरियल आहे, पाणी आहे, फर्टीलायजर आहे त्याचे एस्टीमेट केले जाते आणि नंतर टेंडर केले जाते. लहान गार्डन असेल तरी सुध्दा त्याचे टेंडर केले जाते.

श्रीमती परिणिता फुके:- मा.महापौरजी, तुम्ही कान्ट्रक्टरला कॉन्ट्रक्ट देतांना कुठल्या प्रकारे तो कॉन्ट्रक्ट देण्यात येते. नगरसेवकांना कां सांगितले जात नाही की तुमच्या प्रभागातील छोटे गार्डन हया कॉन्ट्रक्टरला दिले आहे. त्याची माहिती आम्हांला कां दिली जात नाही.

निगम आयुक्त:- मा.महापौरजी, कोणत्याही नगरसेवकांना माहिती पाहिजे आपण तातडीने देवू शकतो. असे काही निर्देश नाही की प्रत्येक कॉन्ट्रक्टरचा पीके दयावा म्हणून. परंतु आपल्याला माहिती पाहिजे असल्यास आम्ही देवू. माहिती आमच्याकडे ठेवण्यासारखी असे काही नाही. असे काही नियम नाही आहे. एएमसीने आताच सांगितले आपण जे काही टेंडर करतो त्यामध्ये जे काही क्लॉजेस असतात त्याप्रमाणे टेंडर फलोट करतो.

श्रीमती परिणिता फुके:- मा.महापौरजी, छोटया गार्डनचे टेंडर निघत नाही म्हणून तुम्ही डायरेक्ट कंत्राट देत असता.

श्रीमती दिव्या धुरडे:-पाईंट ऑफ इन्फोंमेशन मा.महापौरजी, माझ्या प्रभागात ब-याच गार्डनमध्ये समस्या आहेत. कुठल्या गार्डनमध्ये गार्ड नाही. १५ दिवसापासून विचारणा केली तरीही गार्डन विभागाकडून माहिती मागत आहे. अजूनही त्यांनी कुठल्याही प्रकारची माहिती दिलेली नाही. मी काल चोरपगार साहेबांना फोन केला होता. कामात काही गडबळ आहे काय? तुम्ही माहिती देण्यास तयार नाही. गार्डनची दुरावस्था अशी झाली आहे की मुले फुटबॉल गार्डनमध्ये खेळतात. आठ दिवसापासून सांगतात की गार्ड पुरविण्यात येईल म्हणून परंतु एकही गार्डनमध्ये गार्ड आलेला नाही. आताच आयुक्तांनी सांगितले की आम्हांला माहिती देण्यास काही अडचण नाही तर नगरसेवकांना कां माहिती दिली जात नाही. यांच्या कामात काही अडचण आहे कां म्हणून माहिती नगरसेवकांना देत नाही.

श्री.प्रविण दटके:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापौरजी, माझ्या दोन्ही सदस्या वारंवार विचारणा करीत आहे की

छोटे उद्यान देखभालीसाठी कंत्राटदाराला देतांना त्याची नगरसेवकांना माहिती राहत नाही. माझी मागणी आहे की कोणतेही काम हे लोकाभिमुख असावे. मा.नेते देवेंद्रजी फडणवीस, मा. नितीनजी गडकरी आणि मा.पालकमंत्री आणि सर्व लोकप्रतिनिधींनी आपल्या डीपीडीसी फंडाच्या माध्यमातून गार्डनमध्ये ग्रीन जीम लावण्यात आले. परंतु याकडे महानगरपालिकेच्या गार्डन विभागाचे लक्ष नाही. चोरपगार हे अधिकारी अक्षम अधिकारी आहेत. त्यांना काही कळत नाही असा भाग नाही आमचा त्यांना विरोध नाही. एकीकडे कामाचे तुकडे करणे, आयुक्तांचा लेखी आदेश नसतांना एनआयटीचे गार्डन मेंटेंन्सकरिता देवून टाकणे. त्या गार्डनमध्ये अनेक प्रकारच्या तक्रारी आहेत. बहुतांश गार्डनमध्ये गार्ड नाही. यामुळे महानगरची बदनामी होत आहे. या सगळया विषयामध्ये प्रदुषण, पर्यावरण हे महत्वाचे विषय आहे चोरपगार हे सर्वश्री या विभागाचे प्रमुख आहेत. मा.आयुक्त आणि अपर आयुक्त हे चांगले काम करीत आहे परंतु उपायुक्त गार्डन हे या विभागाचे प्रमुख म्हणून काम करण्यास अक्षम ठरलेले आहेत. या शहरातील बगीचे पर्यावरणाच्या दृष्टीने जे आपल्या परिसरातील आहेत त्यांना चांगले ठेवणे हे आपले कर्तव्य आहे. मा.महापौरजी आपण या अनुषंगाने सभागृहात निर्देश दयावे.

महापौर:- सभागृहाची भावना लक्षात घेत असतांना हे सभागृह असे निर्णय घेते जे जे गार्डन मेंटेनन्ससाठी दिलेले आहे तेथे सुचना फलक लावावे, या सुचना फलकांमध्ये किती रुपयांचा कंत्राट दिलेला आहे त्याची तपशील असावे. सोबतच त्या कंत्राटामध्ये कोणकोणते काम स्पेसीफीक दिलेले आहे त्याची संक्षिप्त माहिती असावी, सोबतच त्या कंत्राटदारांचा नंबर असावा, आणि त्या कंत्राटदारांच्या कामामध्ये जर काही शिकायत असेल तर नागपूर महानगरपालिकेचा एक टोल क्रमांक देण्यात यावा त्यावर सामान्य नागरिक शिकायत करु शकेल, सोबतच असे निर्देश देण्यात येते की कोणकोणते कंत्राटदार कोणकोणत्या बगीच्यामध्ये काम करीत आहे याची सुचना जेव्हा केव्हा आपण कंत्राट करु तेव्हा याची माहिती ते कंत्राट देत असतांना संबंधित नगरसेवकांना सुध्दा असायला पाहिजे. याच्या कॅपिसिटीमध्ये कोणकोणते काम करुन घेणे आवश्यक आहे बरेचदा असे सुध्दा असते की जेव्हा आपण डॉक्युमेंट बनवितो त्यामध्ये तो काम नसतो आणि त्या परिसरातील जनतेला ते काम अपेक्षित असते म्हणुन जेव्हा आपण कंत्राट करतो ते कंत्राट करीत असतांना त्या बगीच्यामध्ये कोणकोणत्या बाबींची आवश्यकता आहे त्या बद्यल कंत्राट करण्यापुर्वी आपण जर झोनल स्तरांवर सर्व नगरसेवकांची बैठक घेऊन जर कंत्राट तयार केले तर जास्त लोकाभिमुख होईल, व जनतेच्या दृष्टीने सोयीस्कर होईल त्याप्रमाणे प्रशासनाने पुढील कार्यवाही करावी. या सभागृहाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे प्रत्येक गार्डनमध्ये सुचना फलक लाऊन कंत्राटदारांचे नाव, कंत्राटाचा अमाऊंट, त्यामध्ये समाविष्ट असलेले वर्कस्कोप सोबतच कंत्राटदारांचा नंबर आणि जर कंत्राटदार बरोबर काम करीत नसेल तर त्याच्याबद्यल करण्यात येणारी शिकायत करीता टोल फ्री नंबर नमुद करावा, सोबतच मा.सदस्यांच्या मुळ प्रश्न होता की जे मृत झालेले झाड आहे त्या बद्यल महानगरपालिकेने एक निकष ठरवावे, अशी सुचना आल्यानंतर किती दिवसाच्या आतमध्ये अशी घटना घडली पाहिजे. माझ्या स्वत:च्या घरासमोर एक मोठे पिंपळाचे झाड आहे. जुना भंडारा रोड म्हणजे जुना नॅशनल हायवे आहे. पुर्ण ट्रॅफिक त्या रस्त्यावर असते. त्या झाडाची एक मोठी फांदी खाली पडली बरं झाल ती फांदी कार वर पडली. ती कार पुर्णपणे पिचकली जर एखादया माणसाच्या डोक्यावर पडली असती तर तेथेच त्याचा अपघात झाला असता किंवा मृत्यु सुध्दा झाला असता अशी घटना होऊ नये म्हणुन रस्त्यावरचे जेवढे मोठे झाड आहे आणि ते ट्राफिकला अडथळा करतात आणि त्यांच्या जिवाला धोका आणते अश्या सर्व झाडांची नियमीत ट्रिमींग होणे नितांत आवश्यक आहे या दृष्टीने सुध्दा प्रशासनाने झोननिहाय आपली योजना तयार करावी आणि त्या दृष्टीने नागरिकांना त्रास होणार नाही. त्यांच्या जिवाला धोका होणार नाही या दृष्टीने आपली कार्यपध्दती ठरवावी, असे निर्देश या सभागृहाच्या माध्यमातून देण्यात येते.

**प्रश्न क्र. २२३:-** प्रभाग क्र. २६ अ मधील रस्ते व चौकाचे नामकरण प्रस्तावा संदर्भात प्रश्न

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

अॅड धर्मपाल मेश्राम:- मा.महापौरजी, माझा २२३ क्रमांकाचा जो प्रश्न आहे त्याचा निपटारा झालेला आहे. या सभागृहामध्ये सगळे त्या संदर्भात आलेले आहे. माझी विनंती आहे प्रश्न क्र. २२४ मी घेवू इच्छितो आपण आदेश दयावे.

**प्रश्न क्र. २२४:-** महापौर ॲप उपलब्ध असतांना प्रशासनाने नागपूर लाईव्ह ॲप निर्मीती केली हे खरे आहे काय या संदर्भांत प्रश्न

निगम आयुक्त :- वितरीत केल्याप्रमाणे

अॅड धर्मपाल मेश्राम:- सन्माननीय महापौर साहेब, ऑलरेडी नागपूर महानगरपालिकेमध्ये 'महापौर ॲप' उपलब्ध होती त्या ॲपद्वारे सर्व प्रकारच्या तक्रारी घेणे, त्याचा निपटारा करणे, त्या संदर्भात काय निर्देश झाले त्याची माहिती वितरीत करणे, अशा स्वरुपाची कामे या ॲपद्वारे तत्कालीन महापौरजी श्री.संदीप जोशी असतांना झालेली आहे. असे असल्यावरही पुन्हा 'नागपूर लाईव्ह ॲप' ची कां गरज भासली याचे स्पष्टीकरण प्रशासनाने दयावे अशी मी आपल्याला विनंती करतो. या ॲपसाठी आपल्या प्रशासनासाठी सगळया पध्दतीची सोय असल्यावरही आणि आपल्याकडे कुशल मनुष्यबळ असल्यावरही २ लक्ष ९२ हजार चा अतिरिक्त खर्च प्रशासनाने केलेला आहे. हे सगळे झाल्यावर आज रोजी सगळया प्रकारच्या समस्या शिल्लक आहेत आणि या ॲपची कोणत्याही प्रकारची उपयोगिता राहिलेली नाही. माझी आपल्या माध्यमातून विनंती आहे या ॲपची उपयोगिता काय आहे ? त्यावर आपल्याकडे कुशल मनुष्यबळ उपलब्ध असल्यावरही २ लक्ष ९२ हजार खर्च करण्याची आवश्यकता कां पडली याचे स्पष्टीकरण प्रशासनाने दयावे अशी विनंती करतो.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे.

श्रीमती बॅनर्जी (संचालक, माहिती व तंत्रज्ञान):- आदरणीय महापौरजी, लाईव्ह ॲप यह जो ॲप बनी है उसपर हर सोमवार को मा.आयुक्त साहेब आढावा लेते थे। हम सभी विभाग प्रमुख उस ॲप पर......

महापौर:- प्रश्न बहोत स्पष्ट है की महानगरपालिका मे पहले से एक ॲप मौजुद थी तो दुसरी ॲप की आवश्यकता क्यु ? और दुसरी ॲप पर जो खर्च किया गया उसकी आवश्यकता थी क्या? एकदम स्पष्ट है इसलिये उत्तर फिर से शुरु किजीये जहां से प्रश्न शुरु हुआ है। एक ॲप के रहते दुसरी ॲप की आवश्यकता थी क्या ?

श्रीमती बॅनर्जी(संचालक, माहिती व तंत्रज्ञान):- आदरणीय महापौरजी, जो ॲप बनाई गई थी उसकी वजह यह थी की जो नागरिक है उनमे आणि प्रशासन मे समन्वय हो।

महापौर:- महापौर ॲप मे समन्वय नही था क्या? ऐसा आपका आरोप है क्या?

श्रीमती बॅनर्जी (संचालक, माहिती व तंत्रज्ञान):- आदरणीय महापौरजी, डायरेक्ट ॲपसेन्स अधिकारीयों का ॲप मे नही था।

महापौर:- ॲप को हम सुधारीत कर सकते थे की नही कर सकते थे। नागपूर म्युनिसीपल कार्पोरेशन मे आयटी सेक्शन है। उसमे सक्षम लोग है उन्होने अपनी ॲप तयार की है। क्या हम उनका उपयोग ले सकते थे की नही। महापौर ॲप मे सुधारणा कर सकते थे की नही। हमने कोई ॲप बनाई है तो उसमे महापौर का आदेश क्या है।

श्रीमती बॅनर्जी(संचालक, माहिती व तंत्रज्ञान):- आदरणीय महापौरजी, जब यह ॲप बनाई गई थी तो मै यह डिपार्टमेंट मे नही थी जब मुझे पता चला तो मुझे उत्तर दिया गया की महापौर ॲप के बारे मे हमे मालूम नही ।

महापौर:- याने की महानगरपालिका मे जो काम करने वाले अधिकारी को यह भी पता नही होता की नागपूर

महानगरपालिका मे महापौर ॲप है। तो महानगरपालिका की महापौर ॲपमे आ रही शिकायत का निराकरण क्या एनआयटी के अधिकारी करते थे। महापौर ॲप पर आ रही समस्या का निराकरण कौन करता था।

श्री. संदीप जोशी:- पाईंट ऑफ इन्फोमेशन मा.महापौरजी, महानगरपालिकेत असलेली जी एजन्सी आहे आयटी क्राफ्ट यांच्यातर्फे मी महापौर असतांना ती ॲप तयार करुन घेतली होती. संपुर्ण झोनचे अधिकारी या ॲपवरती उपलब्ध होते. ज्या वेळेस तक्रारी यायच्या त्या संपुर्ण तक्रारी त्या त्या लोकांना फॉरवर्ड करण्यात येत होते. त्यानंतर त्या तक्रारीचे निराकरण होत होते. सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारी या डायरेक्ट येत होत्या. एखादी ॲप जी फुकटात तयार केली होती , एकही पैसा दिला नव्हता ते सोडून प्रशासनाने स्वत:ची ॲप २ लक्ष ९२ हजार रुपये देवून तयार करुन घेतली ही सत्य स्थिती आहे सत्य परिस्थिती आहे.

महापौर:- प्रशासनाने उत्तर दयावे. एक ॲप असतांना दुस-या ॲपची आवश्यकता होती काय? उत्तर नसेल तर तसे सांगावे.

निगम आयुक्त:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. सन्माननीय जोशी साहेब, एक ॲप असतांना दुसरी ॲप असे न बघता त्याचा फायदा कोणता होतो ते बघणे आवश्यक आहे.

ॲड धर्मपाल मेश्राम:- सन्माननीय महापौर साहेब पाईंट ऑफ आर्डर. या प्रश्नाच्या अनुषंगाने आदरणीय आयुक्त महोदयांनी उत्तर दिले तर बरे होईल.

निगम आयुक्त:- सन्माननीय महापौरजी, सन्माननीय सदन. प्रश्नाच्या अनुषंगाने उत्तर देवू इच्छितो. महापौर ॲप बद्दल मला उत्तर देण्यापेक्षा या ॲपचे महत्व काय ते मी आपल्याला सांगू इच्छितो. नागपूर लाईव्ह ॲप हा प्रशासनासाठी अत्यंत आवश्यक ॲप आहे. मी पटलावर सांगू इच्छितो की नागपूर लाईव्ह ॲपमध्ये काही गोष्टी आहेत. महापौर ॲपमध्ये काय गोष्टी आहेत ते ही मी सांगू इच्छितो. नागपूर लाईव्ह ॲपमध्ये टाईम अकाऊन्टबीलीटी निश्चित होती. संबंधित तक्रार रजिस्टर्ड झाल्यानंतर २४ तासात त्याची दखल घेतली नसेल तर....

ॲड धर्मपाल मेश्राम:- सन्माननीय महापौर साहेब,पाईंट ऑफ आर्डर. आतापर्यंत किती तक्रारी होत्या. त्याच्यावरती काय कार्यवाही करण्यात आली. किती तक्रारी पुढे गेल्या. त्याच्यावर कोणत्या संवैज्ञानिक कार्यवाही करण्यात आली. कोणत्या अधिका-याने या ॲपमध्ये नोंदविल्या याचे सुध्दा उत्तर दयावे.

श्री.प्रवीण दटके:-मा.महापौरजी, नागपूर लाईव्ह ॲप आयटी क्राफ्टने चेक केली होती काय? ही ॲप कोणत्या कंत्राटदाराकडून तयार केली होती. ही ॲप तयार करीत असतांना २ लक्ष ९२ लक्ष खर्च लागला त्यामुळे त्यामध्ये माझी विनंती आहे. महापौर ॲप तयार केली आणि मा.आयुक्तांनी ॲप तयार केली त्या दोन्ही ॲप आयटीक्राफ्टच्या अधिका-यांनी चेक केल्या होत्या काय? तक्रारी ज्या प्रत्येक डिपार्टमेंटकडे पाठविल्या जात होत्या त्या आयुक्तांकडे कां दिल्या जात होत्या याची संबंधित विभगाने माहिती दयावी.

निगम आयुक्त:-मा.महापौरजी, मा.सदस्यांनी विचारले की किती कार्यवाही झाल्या आहेत. किती तक्रारीचे निराकरण केले आहेत. किती पेंडेन्सी आहे हे सगळे सविस्तर मी डॅशबोर्ड सह माहिती देवू इच्छितो. सगळे स्क्रिनशार्ट आपल्याला शेयर करु इच्छितो. ते सध्या माझ्या हातात नाही आहे त्याच्यात माहितीमध्ये क्लिअरकट माहिती मिळू शकते. कोणकोणते काम, कोणकोणत्या नागरिकांचे किती वेळात झालेले आहे. विलंब झाल्यामुळे कुणाला शोकॉज देण्यात आलेले आहे. ती संपुर्ण माहिती देण्यास तयार आहे. दुसरे महत्वाचा विषय आहे. याच्यात जो खर्च झालेला आहे, तो ॲप आपल्यात हातात आला आहे. आपल्या महानगरपालिकेसाठी आणि प्रशासनासाठी जे महत्वाचे आपण सगळया प्रकारचे ॲप वापरलेले आहे. त्यामध्ये आणखी काही सुधारणा करायला सन्माननीय सदस्यांच्या सुचना असेल तर आम्ही नक्कीच करणार आहे. या प्रकारचे पुढची कार्यवाही करण्यास तयार आहे. या विषयामध्ये जी काही

प्रक्रिया झालेली आहे ती प्रक्रिया प्रापर झालेली आहे. आपल्या माहितीकरिता सांगतो, ३ लक्षामध्ये एक ॲप तयार होते. आपल्याकडे प्रापर्टी टॅक्सचे काम चालू आहे. जी.एस.चे काम चालू आहे. सर्व कामे आपण एजन्सीमार्फतच करतो,आपली आयटी टीम आहे.

श्री.प्रवीण दटके:- पाईंट ऑफ आर्डर मा.महापोरजी, ३ लक्षात ॲप तयार होतो. तर मा.महापौरांनी तयार केलेला ॲप तो योग्य नव्हता काय? याचे उत्तर प्रशासनाने दयावे.

निगम आयुक्त:-मा.महापौरजी, ॲपच्या संदर्भात अभ्यास करुन पुढच्या वेळेस माहिती सांगतो.

श्री.प्रवीण दटके:-मा.महापौरजी, २०.०७.२०२० रोजी मा.धर्मपाल मेश्राम यांनी विचारलेला प्रश्न आहे. याला सहा महिने झाले आहे. मा.महापौरजी हा विषय २०२१ मध्ये चालू आहे. म्हणजेच महापौर ॲपमध्ये काम करावयाचे नाही, महापौर ॲपवर आलेल्या तक्रारीला प्राथमिकता द्यावयाची नाही. लोकप्रतिनिधींचे काम करावयाचे नाही ज्या डायरेक्ट तक्रारी आयुक्तांपर्यंत येत होत्या. त्या वेळेच्या आयुक्तांना काय वाटत होते माहीत नाही. समन्वय, समन्वय मग तो कोणत्याही राजयकी पक्षाचा असो असला पाहिजे. आयुक्तांना मा.महापौरांनी काम सांगितले ते काम करावयाचे नाही. त्यांना गरजच वाटत नव्हती. असे वातावरण जर प्रशासनात असेल तर समन्वय साधला जावू शकत नाही. मा. महापौरजी, आपण आयुक्तांशी बोलून तो समन्वय साधून एकच ॲपवर काम करावे आणि लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारी जर डायरेक्ट असतील तर त्यांचे सुध्दा निराकरण करण्यात यावे अशी आपल्या माध्यमातून प्रशासनाला विनंती आहे.

महापौर:- सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न मांडला आहे तो अगदी स्पष्ट आहे. एक ॲप असतांना दुस-या ॲपची आवश्यकता होती काय? प्रशासन ज्या पध्दतीने बोलत आहे त्यावरुन प्रशासनाकडे याचे उत्तर नाही.

निगम आयुक्त:-मा.महापौरजी, मी उत्तर दिलेले आहे.

महापौर:- आपण दिलेले उत्तर १०० टक्के चुकीचे आहे. आम्ही कोणत्याही माणसाला शेल्टर करण्याकरिता बसलेलो नाही.

निगम आयुक्त:-मा.महापौरजी, महत्वाचा विषय असाआहे. आपण लोकांना त्यांच्या तक्रारी करण्याकरिता वेगवेगळे माध्यम उपलब्ध करुन दिले आहे. वॉटस्‌अपद्वारे तक्रारी येतात, टिव्टरद्वारे आणि फेसबुक द्वारेही तक्रारी मिळतात. तशाप्रकारे याकडे बघणे आवश्यक आहे. आपण महापौर ॲप बंद केलेली नाही. महापौर ॲप पण आहे आणि नागपूर लाईव्ह ॲप पण आहे.

महापौर:- तक्रार करण्याकरिता एका महानगरपालिकेचे एक ॲप असले पाहिजे की दोन ॲप असले पाहिजे.

निगम आयुक्त:-मा.महापौरजी, एक ॲप करायची की दोन ॲप करायचे हे प्रशासनाचे काम आहे. ॲपमध्ये आपल्याला काय करावयाचे आहे आपण तशी सुचना दयावी.

महापौर:- आयुक्तांनी आपल्या उत्तरामध्ये स्पष्ट नमुद केले आहे. नागपूर महानगरपालिकेत हा प्रश्न सभागृहाच्या पटलासमोर आला प्रशासन आणि जनप्रतिनिधी हे एकाच गाडीचे दोन चाके आहे आणि त्याची दिशा एकच असायला पाहिजे जर दोन चाकांची दोन दिशा राहिली तर गाडी समोर जाऊ शकत नाही. म्हणुन संपुर्ण देशभरात किंवा जगात कुठेही कंम्पलेंट सिस्टीम तयार झाली असेल तर ते एकच असेल, पदाधिका-यांचे वेगळे आणि अधिका-यांचे वेगळे असे कुठेच नाही. हे दुर्दव आहे की नागपूर महानगरपालिकेमध्ये हे दुष्कृत्य घडले आहे. कोणता चांगला, कोणता चांगला नाही. याबद्यल निर्णय करीत असतांना ज्या मानसांकडे आपण आय.टी. ची समक्ष जबाबदारी दिलेली आहे. ज्या कंपनीला नागपूर महानगरपालिकेने कंत्राट देऊन जनतेच्या टॅक्समधील पैशाचा वापर करुन प्रत्येक वर्षी मोठी रक्कम दिलेली आहे त्या संस्थेने तयार केलेली ॲप जर चुकीची असेल तर संबंधित प्रशासनाने त्यांच्याकडुन चांगली

ॲप तयार करुन घेणे ही शासनाची जबाबदारी होती जर त्यांनी चुकीची ॲप तयार केलेली आहे. त्याने आपल्या कर्तव्यांचे पालन केले नाही तर त्याच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता होती. प्रशासनाने हयातीमध्ये असलेल्या ॲपकडे लक्ष दिले नाही. हे दुर्भाग्य आहे की जो मानुस महानगरपालिकेमध्ये आय.टी.चा अधिकारी असतो तो या भाषेत उत्तर देत आहे की महापौरांच्या ॲप बद्यल प्रशासनाला माहिती नाही. माझ्याकडे तक्ता आहे महापौरांच्या ॲपमध्ये दरदिवशी जी शिकायत येते त्याचा तक्ता दरदिवशी माझ्याकडे येते. हा १ महिन्याचा रेकॉर्ड माझ्याकडे आहे तो रेकॉर्ड मी आपणाकडे सादर करतो. म्हणजे महानगरपालिकेच्या महापौरांकडे आलेली ॲप अधिका-यांकडे जाण्यापर्यत ही माहिती सर्वापर्यत जात नव्हती हे सुध्दा चुकीचे आहे. माझे हे म्हणणे कधीच नाही की महापौरांनी तयार केलेली ॲप हे सर्वस्वी होते आणि सर्वात उत्तम होते. त्या ॲपमध्ये सुधार करुन त्याला आणखी जास्त चांगले बनविता आले असते याच्यासाठी दोघांनी एकमेकांशी चर्चा करुन केले असते तर झाले असते पण मधल्या काळात प्रशासन आणि अधिकारी, पदाधिकारी याच्यामध्ये संवाद ज्याप्रमाणे असायला पाहिजे होता तो संवाद त्याप्रमाणे नव्हता, मग एक स्पर्धा निर्माण झाली ती स्पर्धा सध्याच्या स्थितीमध्ये नाही झाली पाहिजे. प्रशासन जर आपसात स्पर्धा करेल तर ही चुकीची बाब आहे. आम्ही कोणाचे काम करायला बसलो आहे जनतेचे, आणि प्रशासन सुध्दा जनतेचे काम करायला बसले आहे. म्हणुन एकच ॲप असणे आवश्यक आहे. मेरी कमीज तेरे कमीज से सफेद कैसी, यह चर्चा का विषय नही है पहनने के लिये कमीज ढंग की होनी चाहिये, यही चर्चा का विषय है, इसलिये ॲप एकही होनी चाहिये और ॲप एकही होंगी और उस ॲप मे त्रुटी नही है ऐंसा नही है अगर किसी बात की कोई शिकायत महानगरपालिका मे दर्ज होती है तो उसकी सुचना केवल अधिकारीयोंको होनी चाहिये उस वार्ड के नगरसेवक को नही होनी चाहिये यह अच्छी यंत्रणा है क्या ? महानगरपालिका के प्रशासनव्दारा तयार की गये ॲप मे जनप्रतिनिधीयोंको मुद्याम बाहर निकाल कर के फेका गया है जैसे हम लोग खाने मे से मख्खी फेकते है, जनप्रतिनिधी व्हर्सेस प्रशासन इस प्रकार की स्पर्धा करना ऐंसा प्रथमदृष्टी दिखायी देता है इसलिये इस ॲप मे पुर्ण रुप से नगरसेवकोंका असेस होना चाहिये, मुझे पता नही था सभागृह मे यह विषय था, मैने इस विषय पर बैठक ली थी, अति.आयुक्त महोदय को इस प्रकार के निर्देश भी दिये थे, इसमे संबंधित शिकायत आने के बाद जिस प्रकार से हमे रिफ्लेक्ट होता है उसी प्रकार से संबंधित अधिकारी के साथ साथ नगरसेवकों को भी रिफ्लेक्ट होना चाहिये। इससे कार्य की गतीशिलता बढेगी प्रशासनिक अधिकारीयों के साथ साथ जनप्रतिनिधी भी उस दिशा से काम करने लगेगे, इस दृष्टीसे उनका भी असेस इसमे होना नितांत आवश्यक है, और इस दृष्टी से इन सारी बातों का समावेश करते हुये प्रशासन अलग काम कर रहा है, जनप्रतिनिधी अलग काम कर रहे है, इनके पास अलग शिकायत जा रही है, उनके पास अलग शिकायत जा रही है, महापौर कार्यालय मे कोई शिकायत आती है तो मै उसे निर्देशित आयुक्त के पास करता हु इसलिये की आयुक्त को प्रशासन ने अधिकार दिये है, आयुक्त अगर इस प्रकार का निर्णय ले की लोगों ने महापौर कार्यालय मे न जाकर मेरे कार्यालय मे आना चाहिये तो ऐंसे प्रशासन नही चल सकता। यह सारी प्रथा बंद होकर के महानगरपालिका मे एकही ॲप होना चाहिये, सर्वस्वी ॲप होनी चाहिये, और उस ॲप का नाम क्या हो वह यह सभागृह तय करले उस अनुरुप उस ॲप के माध्यम से महानगरपालिका मे आने वाले कार्यकाल मे शिकायत दर्ज होनी चाहिये उसमे कुछ और चिजों का समावेश करना होंगा, संबंधित सदस्य अपना पत्र मा.आयुक्त महोदय के माध्यम से आयुक्त महोदय इसके लिये जिस अधिकारीयों को उपयुक्त समझते है उसके पास अपने सुचना का पत्र दे। वर्तमान ॲप मे भी सुधार करने की आवश्यकता हो तो महानगरपालिका मे एक ही ॲप कार्यरत होगी इस प्रकार का निर्देश सभागृह देता है। पदग्रहन के बाद मेरी पहिली बार प्रेस हुयी थी उस प्रेस मे मुझसे पत्रकारनों पुछा था की महानगरपालिका मे दो ॲप रहेंगी क्या ? तो मैने स्पष्ट रुप से कहा था की महानगरपालिका मे समस्या निराकरण करने के लिये महानगर की जनता यह टेबल

टेनिस का बॉल नही है कभी उसके टेबल पर तो कभी उसके टेबल पर यह जनता वह जानती है। इसलिये इघर उधर हिचकुले खाने की आवश्यकता नही.महानगरपालिका प्रशासन की एक ही ॲप होंगी, मै स्पष्ट रुप से निर्देश देना चाहता हु उस ॲप के बारे मे आनेवाले १५ दिन के अंदर एक निर्णय लेकर के अधिकृत रुप से एकही ॲप जो महानगरपालिका की रहेगी उसकी जानकारी प्रसार माध्यम से जनता तक पोहचाये, उसके माध्यम से प्रशासन और पदाधिकारी दोनो मिलकर के काम कर रहे है यह बात नागरिकों के बिच मे जानी चाहिये इस कदम को १५ दिन के अंदर एक्झीक्युट करे इस प्रकार का निर्देश यह सभागृह देता है।

महापौर:- ही सभा दहा मिनिटांकरिता स्थगित करण्यात येते.

| | |
|---|---|
| **निगम सचिव** | **महापौर** |
| **नागपूर महानगरपालिका,नागपूर** | **नागपूर महानगरपालिका,नागपूर** |